पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ● वर्ष १६ ● अंक ३० ● बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

आयुष्यात यशस्वी व्हायचं असेल तर
स्वतःवर विश्वास ठेवायला शिका,
कारण इतर लोक फक्त सल्ला देतात पण
संघर्ष आपलाच असतो.

सिटी न्यूज सुपरफास्ट
तेल्हारा शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिराती साठी
संपर्क
कृष्णा विखे
शहर प्रतिनिधी
+91 7262838288

# राज्यपालांनी घ्यावी प्रशासकीय यंत्रणेची दखल

## एम आय डी सी पोलिसांची गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ | कृषी विद्यापीठात अनागोंदी कारभार, जनतेच्या पैशांची लुटमार | सरकारने विद्यापीठाच्या कस्टोडियन, कुलसचिव यांची भूमिका तपासावी

प्रतिनिधी ५ ऑगस्ट








अकोला : कृषी विद्यापीठात लाखों रुपयांचा भ्रष्टाचार,फाईल गहाळ प्रकरणात एम आय डी सी पोलिसात तक्रार दिल्यानंतर देखील गुन्हा दाखल करण्यास पोलिस टाळाटाळ करत आहे. पोलिस एक प्रकारे विद्यापीठ प्रशासनाने कुलगुरुंची पुर्व परवानगी घेत दिलेल्या तक्रारीकडे दूर्लक्ष करत असून या प्रकरणात पोलिसांद्वारे भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठिशी घालण्याचा प्रयत्न तर होत नाही याची खातरजमा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी करण्याची गरज आहे. कृषी विद्यापीठाने स्वयंस्पष्ट तक्रार दिली आहे.

कृषी विद्यापीठाचे सर्वोच्च पदाधिकारी अर्थात कुलगुरु यांची गुन्हे दाखल करण्याची पुर्वमान्यता आहे. असे सर्व असताना कुठल्या कारणाने तक्रारीची फाईल एम आय डी सी पोलिसांनी दाबून ठेवली असा प्रश्न उपस्थित होत आहे. कृषी विद्यापीठाच्या पोलिस तक्रारी बाबत राजभवनातून दखल घेण्याची गरज आहे. त्याच बरोबर या विषयावर संपर्क केल्यावर कृषी परिषदेचे अधिकारी माहिती देण्यास उपलब्ध झाले नाहीत.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात झालेल्या ४० लाखांच्या भ्रष्टाचार प्रकरणात विद्यापीठाने प्रशासकीय कार्यवाही केल्याने आता होत असलेल्या फौजदारी कारवाईत टाळाटाळ होत असल्याचे चित्र आहे. या सर्व प्रकरणात संशोधन संचालक डॉ. श्यामसुंदर माने हे प्रमुख सुत्रधार असून त्यांच्याकडे घोटाळ्यातील काही फाईल्स असल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे. भ्रष्टाचार प्रकरणात पोलिसांद्वारे होत असलेली टाळाटाळ ही आरोपींच्या पथ्यावर पडत असून या प्रकरणातील महत्वाचे पुरावे नष्ट करण्यासाठी ही टाळाटाळ पुरेशी आहे. या प्रकरणात आता विद्यापीठाने कोर्टातून आरोपींवर गुन्हा दाखल करावा काय अशी विचारणा होत असून एकूण कृषी विद्यापीठाच्या भ्रष्ट यंत्रणेसोबत एम आय डी सी पोलिसांनी हात मिळवणी तर केली नाही ना अशी शंका विद्यापीठ प्रशासनातील वरिष्ठांना आहे. तक्रार करुन गुन्हा दाखल न करणे हा दोन सरकारी यंत्रणेतील समन्वय नसल्याचे चित्र आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात झालेल्या ४० लाखांच्या भ्रष्टाचाराची तक्रार एम आय डी सी पोलिसात करण्यात आली आहे. भ्रष्टाचार उघड होणे प्रशासकीय बाब आहे. आणि फौजदारी गुन्हा ही कायदेशीर प्रक्रिया आहे. या दोन्हीत सरमिसळ करत विद्यापीठ प्रशासन प्रशासकीय बाबीवर संबंधितांना निलंबित करत नसल्याचे चित्र आहे. राज्य सरकारच्या प्रतिनिधी असलेल्या कुलसचिव प्रिती रोडगे यांची भूमिका विद्यापीठाच्या गार्डीयन कमी भ्रष्टाचाराच्या पाठिराख्या जास्त असल्याचे चित्र आहे. त्यांना वारंवार या प्रकरणात ज्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची तक्रार केली त्यांना निलंबित का केले नाही याची विचारणा केली असता त्यांनी यावर कुठली ही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. तर विद्यापीठाच्या (जनसंपर्क अधिकारी) पीआरओकडून माहिती घ्या असे फर्मान सोडतात. तर दूसरीकडे विद्यापीठाचे पीआरओ फोन उचलत नाही. त्यामुळे या सर्व प्रकरणात विद्यापीठाच्या भूमिकेबरोबर पोलिसांची भूमिका तपासण्याची गरज आहे. कुलपती म्हणून विद्यापीठाचे प्रमुख म्हणून राज्यपाल आहे. त्यांनी या सर्व प्रकरणात विद्यापीठातील अनागोंदी बरोबर पोलिस प्रशासनातील ढिलाईची चौकशी करण्याची गरज आहे. या विषयावर राज्याचे कृषी मंत्री दत्ता भरणे यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या पीए ने फोन उचलला नाही. या बातमी संदर्भात विद्यापीठाच्या कुलसचिव यांच्या सोबत संपर्क केला असता त्यांनी या विषयावर कुठली ही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. डॉ.श्यामसुंदर माने यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. पीआरओ किशोर बिडवे यांनी फोन उचलला नाही. एम आय डी सी पोलिस स्टेशनचे ठाणेदार यांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केला नाही असे भ्रमणध्वनीवर सांगितले.

### डॉ.माने यांचे कारनामे सुरुच

कृषी विद्यापीठाच्या लाखो रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणातील प्रमुख सुत्रधार डॉ.श्यामसुंदर माने हे मंगळवारी प्रकल्पग्रस्त निवड समितीची बैठकीत उपस्थित होते. आर आर सी न्यूजचा प्रतिनिधी उपस्थित असल्याने त्यांनी डीआर ऑफिसच्या बाजुच्या सभागृहात मिटिंग घेतली नाही. त्यांनी डीन ऑफिसच्या बाजुच्या सभागृहात मिटिंग घेतली. पण, घेतलेल्या मिटिंग मध्ये समाजकल्याण विभागाचे अधिकाऱ्यांनी त्यांचा प्रतिनिधी पाठविल्याने मोठी अडचण समोर आली आहे. या मिटिंगचे मिनिट्स तपासल्यास त्यात घोळ घातला गेल्याची माहिती समोर आली आहे. प्रकल्पग्रस्त निवडीनंतर या समितीवर प्रश्न उपस्थित झाल्यास झालेली निवड प्रक्रिया वैध की अवैध यावर प्रश्न उपस्थित होऊ शकतो. त्यामुळे निवड होणाऱ्या उमेदवारांच्या डोक्यावर टांगती तलवार राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### दोघांच्या मृत्यूची चौकशी करण्याची गरज

विद्यापीठाने पोलिसात दाखल केलेल्या तक्रारीत जे दोघे जिवंत नाही त्या पाल आणि लांजेवार यांच्या मृत्यूची चौकशी करण्याची गरज आहे. पॉल याच्या मृत्यूचे कारण अद्याप विद्यापीठाला माहित नाही. त्यांच्या मृत्यूमागे गहाळ फाईल्स प्रकरणाचे काही धागेदोरे जुळतात काय याची दबक्या आवाजात चर्चा विद्यापीठात आहे. इतकेच नाही तर लांजेवार यांचा हार्ट अटॅकने झालेल्या मृत्यू मागे गहाळ फाईल्स चा दबाव होता काय याची ही चौकशी झाली पाहिजे अशी चर्चा विद्यापीठाच्या प्रशासकीय वर्तुळात आहे.

## »थोडक्यात

### वैयक्ति वादातून बाळाच्या तोंडात फेविक्विक ओतले!

पुणे : पुण्याच्या लोहगाव परिसरातून एक अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. घरातील वादाचा राग काढण्यासाठी एका महिलेनं चक्क नऊ महिन्यांच्या निरागस बाळाच्या तोंडात फेविक्विक टाकल्याचा भयंकर प्रकार घडला आहे. या अमानुष कृत्याप्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीसह तीन जणांवर गुन्हा नोंदवला आहे. सानिया शेख (रा. कलवड वस्ती, लोहगाव), रियाज इमाम हाल्याळ (मुंबई) आणि हाजी मलंग शेख (रा. कांदिवली, मुंबई) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

### मुंबई पोलिस वेतन घोटाळा व्याप्ती वाढणार!

मुंबई : मुंबई पोलिस दलातील वेतन घोटाळा उघडकीस आल्यानंतर, या घोटाळ्याची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे. केवळ २०१९ आणि २०२०मध्ये नव्हे, तर सेवार्थ प्रणाली सुरू होण्यापूर्वीही अशाप्रकारे फेरफार झाल्याचा संशय असल्याने कामकाजाचे ऑडिट सुरू झाले असून तपास गुन्हे शाखेकडे देण्यात आला. आरोपींनी याआधी ज्या ज्या कार्यालयांत कर्तव्य बजावले, त्या ठिकाणचा लेखाजोखा तपासला जात आहे. हे ऑडिट झाल्यावर घोटाळ्यातील रकमेचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. ज्या दहा व्यक्तींच्या नावाने वेतन काढले, त्या कोण, याचा तपास सुरू आहे.

---

### महिला प्रदेशाध्यक्षापदी वैशाली नागवडे नियुक्त

मुंबई : अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकर यांच्या गच्छंतीनंतर रिकाम्या झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदावर वैशाली नागवडे यांची वर्णी लागली आहे. मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात राष्ट्रवादीच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या हस्ते नागवडे यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. अजित पवारांच्या अत्यंत विश्वासू कार्यकर्त्या म्हणून वैशाली नागवडे यांची ओळख आहे. त्यांच्या निवडीमुळे राष्ट्रवादीच्या महिला आघाडीत नवे वळण आले आहे.

# अकोला सायबर पोलिसांची कारवाई!

## सायबर फसवणुकीतील ५ आरोपींना गोव्यातून अटक

प्रतिनिधी ५ ऑगस्ट



अकोला: अकोला सायबर पोलीस ठाण्याच्या पथकाने आंतरराज्यीय सायबर गुन्हेगारांविरुद्ध मोठी कारवाई करत गोव्यातून ५ आरोपींना अटक केली आहे. पहिल्या प्रकरणात, अकोल्यातील एका टाईल्स व्यापाऱ्याला कमी भावात माल देण्याचे आमिष दाखवून ४,१९,००१ रुपयांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली होती. या गुन्ह्यात उत्तर गोव्यातून यशपाल वासुदेवभाई निमावत आणि सोनु भवरकुमार यादव या दोघांना २९ जुलै रोजी अटक करण्यात आली. दुसऱ्या घटनेत, अकोल्यातील एका महिला डॉक्टरला 'अल्गो ट्रेडिंग' मध्ये जास्त परताव्याचे आमिष दाखवून ४५,६६,७५० रुपयांचा गंडा घालण्यात आला होता. या प्रकरणी देवेंद्र सुरेशचंद्र शर्मा, अंकुर सुरेश चावडा आणि हबीबुर रहमान फकरुद्दीन या तीन आरोपींना पिलर्ण (गोवा) येथून ३० जुलै रोजी ताब्यात घेण्यात आले. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे ७ बँक खाती फ्रीज केली. आरोपींकडून २ लाख ५० हजार रुपये रोख, ३२ मोबाईल फोन, १ टॅब, १ मॉनिटर आणि ५ वाय-फाय राऊटरसह इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. अज्ञात व्यक्तींशी ऑनलाईन व्यवहार करताना नागरिकांनी सतर्क राहावे आणि फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या सायबर हेल्पलाइनवर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# मुंबईवर दहशतवादी हल्ला होणार!

मुंबई : मुंबईवर दहशतवादी हल्ला होणार असल्याची सोशल मिडियावर पोस्ट शेअर करण्यात आली. त्यानंतर मुंबई पोलिसांकडून घटनेची गंभीर दखल घेण्यात आली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर ऑगस्ट २०२६ दरम्यान भारतासाठी धोक्याचा इशारा देणारी पोस्ट करण्यात आली. ही पोस्ट शेअर करण्यात आल्याने खळबळ उडाली. या पोस्टमध्ये ९ ते १८ ऑगस्ट हा अतिशय धोकादायक कालावधी असून पाकिस्तानी दहशतवाद्यांकडून मोठ्या हल्ल्यांची शक्यता व्यक्त करण्यात आली. ही पोस्ट इंग्रजीत आहे. अनेकांनी ही पोस्ट रिशेअर देखील केली. तसेच पोलिसांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. पोलिसांकडून या पोस्टची दखल घेण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# काम सुधारा अन्यथा खांदेपालट करावी लागेल- उपमुख्यमंत्री शिंदे

## संजय शिरसाट, संजय राठोडसह चार मंत्र्यांना निर्वाणीचा इशारा

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्याल पक्षातील काम न करणाऱ्या काही मंत्र्यांना फैलावर घेतल्याची माहिती समोर आली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीपूर्वी शिवसेना पक्षाची स्वतंत्र प्री-कॅबिनेट बैठक पार पडली. या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या चार मंत्र्यांना सज्जड दम दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

या चार मंत्र्यांपैकी तीन जणांची नावे समोर आली आहेत. यामध्ये सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, वने, मदत व पुनर्वसन तसेच मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड आणि शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा समावेश आहे. या मंत्र्यांनी आगामी काळात आपल्या कामगिरीत सुधारण न केल्यास त्यांचे मंत्रिपद काढून घेतले जाऊ शकते, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. या मंत्र्यांना वारंवार तंबी देऊनही त्यांच्या खात्याचा कारभार सुधारलेला नाही. याशिवाय, शिवसेना पक्षाच्या विस्तारासाठी या मंत्र्यांकडून अपेक्षित असलेले काम होताना दिसत नसल्याचे सांगितले जाते. परिणामी एकनाथ शिंदे या चार मंत्र्यांच्या कामावर खूश नसून त्यांनी संबंधितांना इशारा दिला आहे. दर तीन महिन्यांनी एकनाथ शिंदे यांना मंत्र्यांच्या कामगिरीचा एक रिपोर्ट दिला जातो. त्या अहवालात संबंधित मंत्र्यांच्या कामगिरीत सुधारणा दिसली नाही तर त्यांची मंत्रिपदावरुन उचलबांगडी होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. एकनाथ शिंदे यांनी एकप्रकारे या मंत्र्यांना पायउतार होण्यासाठी तयार राहा, अशी सूचनाच दिली आहे. त्यामुळे आता हे मंत्री आपली कामगिरी उंचावण्यासाठी काय करणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



# इन्शुरन्स नसेल तर मिळणार नाही पेट्रोल!

## देशभरात खळबळ : सुप्रीम कोर्टाचा नवा नियम

प्रतिनिधी ५ ऑगस्ट



**दिल्ली** : आता सर्वसामान्यांची चिंता वाढवणारी एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. देशभरात विनाविमा धावणाऱ्या वाहनांच्या वाढत्या संख्येला आळा घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. ज्या वाहनांचा विमा नसेल, त्यांना पेट्रोल पंपावर पेट्रोल किंवा डिझेल दिले जाणार नाही, असा थेट प्रस्ताव न्यायालयाने दिला आहे. ही मोहीम प्रथम पायलट प्रोजेक्ट म्हणून राबवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत.

विमा नसलेल्या सर्व गाड्यांवर आता ऑटोमॅटिक ई-चलान फाटणार आहे. डिजिटल ट्रॅकिंग आणि कॅमेऱ्यांच्या मदतीने अशा गाड्यांची त्वरित ओळख पटवून थेट कारवाई केली जाणार आहे. रस्ते अपघातात निष्पाप पीडितांना वेळेवर विम्याची भरपाई मिळावी, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात येत आहे. त्यामुळे आता विमा नसलेल्या वाहनधारकांना थेट पेट्रोल पंपावरच ब्रेक लागणार असून, वाहनाचा विमा नूतनीकरण केल्याशिवाय इंधन मिळणे कठीण होणार आहे.

देशभरात तब्बल ५६ टक्के वाहने विना विमा रस्त्यावर धावत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले. हे प्रकरण सुप्रीम कोर्टात गेले होते. यावर कोर्टाने अतिशय कठोर निर्णय घेतला. हायटेक तंत्रज्ञानाचा वापर करून ही कठोर यंत्रणा राबवण्याचे आदेश प्रशासनाला कोर्टाने दिले आहेत. त्यामुळे आता इन्शुरन्स संपलेल्या गाडीचालकांना त्वरित नूतनीकरण करावे लागणार असून, अन्यथा थेट हजारो रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. त्याशिवाय पंपावर पेट्रोल आणि डिझेलही मिळणार नाही. सध्या पायलट प्रोजेक्ट कोर्टाने राबवायला सांगितला आहे. भविष्यात हा निर्णय संपूर्ण देशभरात लागू होऊ शकतो, असे सांगण्यात येत आहे.

### शिक्षा आणि दंडाचीही तरतूद

मोटार वाहन कायद्यान्वये, वैध थर्ड-पार्टी विम्याशिवाय वाहन चालवल्यास किंवा चालवण्यास कारणीभूत ठरल्यास कठोर शिक्षेची तरतूद आहे. पहिल्यांदा गुन्हा केल्यास ३ महिन्यांपर्यंत तुरुंगवास किंवा २,००० रुपयांपर्यंत दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. दुसऱ्यांदा पकडल्यास ३ महिन्यांपर्यंत तुरुंगवास किंवा ४,००० रुपयांपर्यंत दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

### १६.५ कोटी वाहनांना विमाच नाही

न्यायमूर्ती संजय करोल आणि प्रशांत कुमार मिश्रा यांच्या खंडपीठ या प्रकरणाची सुनावणी झाली. भारतामध्ये धावणाऱ्या वाहनांपैकी तब्बल ५६ टक्के वाहने विमा नसलेली आहेत, यावर खंडपीठाने आश्चर्य व्यक्त केले. आकडेवारीनुसार, देशात ३०४ दशलक्ष नोंदणीकृत वाहने आहेत. त्यापैकी १६५ दशलक्ष वाहने विमा नसलेली आहेत. सरकारी आकडेवारीनुसार देशातील २२ टक्के रस्ते अपघातांमध्ये विमा नसलेल्या वाहनांचा समावेश असतो. न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, मोटार वाहन कायद्याच्या कलम १४६ अंतर्गत अनिवार्य विम्याचा मूळ उद्देशच निष्फळ ठरत आहे. त्यामुळे अपघातग्रस्तांना नुकसान भरपाईसाठी दीर्घकाळ कायदेशीर लढा देण्यास भाग पाडले जात आहे.

# माजी मंत्री गुलाबराव गावंडे यांची प्रकृती स्थिर; मेंदूवरील यशस्वी शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत सुधारणा

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला** : राज्याचे माजी क्रीडामंत्री, ज्येष्ठ लोकनेते तथा राष्ट्रीय कबड्डीपटू गुलाबराव गावंडे यांची प्रकृती सध्या स्थिर असून अमरावती येथे मेंदूवरील यशस्वी शस्त्रक्रियेनंतर त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. सध्या त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून वैद्यकीय तज्ज्ञांनी त्यांना संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला आहे. पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी भाऊंच्या तब्येतीची चौकशी केली आहे. तर आमदार हरिश पिंपळे, आमदार नितीन देशमुख, खा.संजय देशमुख, आ.साजीद खान आदींनी प्रत्यक्ष हॉस्पीटल येथे जावून विचारपूस केली. संग्राम आणि युवराज गावंडे यांची भेट घेत विचारपूस केली. भाऊंची तब्येत सुधारण्यासाठी सर्वत्र प्रार्थना करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माजी क्रीडामंत्री, ज्येष्ठ लोकनेते तथा राष्ट्रीय कबड्डीपटू भाऊ गुलाबराव गावंडे हे अमरावती येथे एका विवाह सोहळ्यासाठी गेले असताना त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. श्वास घेण्यास त्रास होऊ लागला तसेच तीव्र डोकेदुखीचा त्रास जाणवू लागल्याने त्यांना तातडीने अमरावती येथील रेनबो इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स या मल्टीस्पेशालिटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात त्वरित सिटीस्कॅन करण्यात आल्यानंतर मेंदूत रक्तस्त्राव झाल्याचे निदान झाले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन न्यूरोसर्जन डॉ. स्वरूप गांधी, डॉ. अजिंक्य जामटे आणि डॉ. श्याम राठी यांच्या तज्ज्ञ पथकाने तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. सुमारे तीन तास चाललेल्या या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेद्वारे मेंदूतील रक्तस्त्राव नियंत्रणात आणण्यात आला. ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली असून गावंडे यांच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा होत असल्याची माहिती मिळाली आहे. गुलाबराव गावंडे हे राज्याचे माजी क्रीडामंत्री तसेच जनसामान्यांशी घट्ट नाळ जोडलेले लोकनेते म्हणून ओळखले जातात. राष्ट्रीय स्तरावरील कबड्डीपटू म्हणून त्यांनी क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. वयाच्या ७४ व्या वर्षीही ते सामाजिक, धार्मिक, राजकीय तसेच विविध सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होत असतात. शस्त्रक्रियेदरम्यान त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमंडळी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने अमरावती येथे उपस्थित होते. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी राज्यभरातील समर्थक आणि हितचिंतकांकडून प्रार्थना व्यक्त करण्यात येत आहेत.



### आजारांनाही पराभूत करणारा लढवय्या!

राजकारण, समाजकारण आणि क्रीडा क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे माजी क्रीडामंत्री गुलाबराव गावंडे हे खऱ्या अर्थाने लढवय्या व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. राष्ट्रीय कबड्डीपटू म्हणून मैदानावर अनेक आव्हानांवर मात करणाऱ्या गावंडे यांनी सार्वजनिक जीवनातही जनतेशी कायम घट्ट नाळ जपली आहे. अचानक उद्भवलेल्या मेंदूतील रक्तस्त्रावासारख्या गंभीर आजारावर यशस्वी शस्त्रक्रियेनंतर त्यांनी पुन्हा एकदा जिद्दीने मात करण्याची चिन्हे दाखवली आहेत. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून उपचार सुरू आहेत. मैदानावर प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करणारा हा लढवय्या नेता, स्वतःवर आलेल्या संकटालाही त्याच जिद्दीने पराभूत करत आहे, अशी भावना त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त होत आहे.

## पर्यावरण संरक्षण काळाची गरज

पर्यावरण संरक्षण म्हणजे आपल्या सभोवतालचे नैसर्गिक आवरण, हवा, पाणी आणि वनांचे रक्षण करणे होय. यामध्ये अधिक झाडे लावणे, पाणी व ऊर्जेची बचत करणे आणि कचरा कमी करणे या मुख्य उपायांचा समावेश होतो.

पर्यावरण संरक्षणाचे मुख्य उपाय: अधिक रोपे लावणे आणि जंगलतोड थांबवणे, पाणी आणि विजेचा कमी व योग्य वापर करणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि वस्तूंचा पुनर्वापर करणे (रिसायकल).

गाडीऐवजी चालत जाणे, सायकलीचा वापर करणे किंवा सार्वजनिक वाहतुकीची निवड करणे, पर्यावरण सुरक्षा म्हणजे आपल्या सभोवतालच्या नैसर्गिक आवरणाला संरक्षण देणे आणि ते जीवनासाठी अनुकूल ठेवणे. पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा करण्याच्या उद्देशाने १९८६ मध्ये हा कायदा करण्यात आला.

# ‘हे माणसासाठी एक छोटे पाऊल असले तरी मानवजातीसाठी मोठी झेप’!





नील आर्मस्ट्राँग यांची आज जयंती

नील एल्डन आर्मस्ट्राँग यांचा जन्म ५ ऑगस्ट १९३० मध्ये झाला. ते एक अमेरिकन अंतराळवीर आणि वैमानिक अभियंता होते, जे १९६९ च्या अपोलो ११ मोहिमेचे कमांडर म्हणून चंद्रावर पाऊल ठेवणारे पहिले व्यक्ती ठरले. ते नौदल वैमानिक , चाचणी पायलट आणि विद्यापीठाचे प्राध्यापक देखील होते.

आर्मस्ट्राँग यांचा जन्म आणि संगोपन ओहायोमधील वापाकोनेटाजवळ झाले. त्यांनी पर्ड्यू विद्यापीठात एरोनॉटिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास करण्यासाठी प्रवेश घेतला, जिथे हॉलोवे योजनेंतर्गत अमेरिकन नौदलाने त्यांच्या शिक्षणाचा खर्च उचलला होता. ते १९४९ मध्ये मिडशिपमन आणि पुढच्या वर्षी नौदल वैमानिक बनले. त्यांनी कोरियन युद्धात भाग घेतला, जिथे त्यांनी यूएसएस एसेक्स या विमानवाहू जहाजावरून ग्रुमन एफ९एफ पँथर हे विमान उडवले. युद्धानंतर, त्यांनी पर्ड्यूमधून आपली पदवी पूर्ण केली आणि कॅलिफोर्नियातील एडवर्ड्स एअर फोर्स बेस येथील नॅशनल अॅडव्हायझरी कमिटी फॉर एरोनॉटिक्स हाय-स्पीड फ्लाइट स्टेशनवर चाचणी वैमानिक बनले. ते सेंच्युरी सिरीजच्या लढाऊ विमानांचे प्रकल्प वैमानिक होते आणि त्यांनी नॉर्थ अमेरिकन एक्स-१५ हे विमान सात वेळा उडवले. ते अमेरिकन हवाई दलाच्या ‘ मॅन इन स्पेस सूनेस्ट’ आणि ‘एक्स-२० डायना-सोअर’ या मानवी अंतराळ उड्डाण कार्यक्रमांमध्येही सहभागी होते.

आर्मस्ट्राँग १९६२ मध्ये निवडलेल्या दुसऱ्या गटात नासाच्या अंतराळवीर दलात सामील झाले. त्यांनी मार्च १९६६ मध्ये जेमिनी ८ चे कमांड पायलट म्हणून आपले पहिले अंतराळ उड्डाण केले आणि अंतराळात उड्डाण करणारे नासाचे पहिले नागरी अंतराळवीर बनले. पायलट डेव्हिड स्कॉट यांच्यासोबतच्या या मोहिमेदरम्यान, त्यांनी दोन अंतराळयानांचे पहिले डॉकिंग केले; अडकलेल्या थ्रस्टरमुळे यान धोकादायकरीत्या कलंडू लागले, तेव्हा आर्मस्ट्राँग यांनी ते स्थिर करण्यासाठी आपल्या पुनर्प्रवेश नियंत्रण इंधनाचा काही भाग वापरल्यानंतर ही मोहीम रद्द करण्यात आली. अपोलो ११ चे कमांडर म्हणून आर्मस्ट्राँग यांच्या दुसऱ्या आणि शेवटच्या अंतराळ उड्डाणाच्या प्रशिक्षणादरम्यान , अपघात होण्याच्या काही क्षणांपूर्वी त्यांना लुनार लँडिंग रिसर्च व्हेईकलमधून बाहेर पडावे लागले.

२० जुलै १९६९ रोजी, आर्मस्ट्राँग आणि अपोलो ११ लुनार मॉड्यूल (एलएम) चे पायलट बझ आल्ड्रिन चंद्रावर उतरणारे पहिले लोक ठरले , आणि दुसऱ्या दिवशी त्यांनी लुनार म ॅ ड्यू लईगल अंतराळयानाच्या बाहेर अडीच तास घालवले, तर मायकल कॉलिन्स अपोलो कमांड मॉड्यूल कोलंबियामध्ये चंद्राच्या कक्षेत राहिले. जेव्हा आर्मस्ट्राँगने चंद्राच्या पृष्ठभागावर पहिले पाऊल ठेवले, तेव्हा ते प्रसिद्धपणे म्हणाले: ‘ हे माणसासाठी एक छोटे पाऊल आहे, मानवजातीसाठी एक मोठी झेप आहे. याचे जगभरातील अंदाजे ५३० दशलक्ष दर्शकांसाठी थेट प्रक्षेपण करण्यात आले. अपोलो ११ हा अंतराळ शर्यतीत अमेरिकेचा एक मोठा विजय होता , कारण १९६१ मध्ये राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांनी दशकाच्या अखेरीस ‘चंद्रावर माणसाला उतरवणे आणि त्याला पृथ्वीवर सुरक्षितपणे परत आणणे’ हे राष्ट्रीय उद्दिष्ट प्रस्तावित केले होते. कॉलिन्स आणि आल्ड्रिन यांच्यासोबत, आर्मस्ट्राँग यांना राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्या हस्ते ‘प्रेसिडेंशियल मेडल ऑफ फ्रीडम’ प्रदान करण्यात आले आणि त्यांना १९६९ चा ‘ कॉलिअर ट्रॉफी’ मिळाली. राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांनी १९७८ मध्ये त्यांना ‘ काँग्रेसनल स्पेस मेडल ऑफ ऑनर’ प्रदान केले , १९७९ मध्ये ‘नॅशनल एव्हिएशन हॉल ऑफ फेम’ मध्ये त्यांचा समावेश करण्यात आला आणि २००९ मध्ये त्यांना त्यांच्या माजी सहकाऱ्यांसह ‘ काँग्रेसनल गोल्ड मेडल’ प्रदान करण्यात आले.

१९७१ मध्ये नासातून राजीनामा दिल्यानंतर, आर्मस्ट्राँग यांनी १९७९ पर्यंत सिनसिनाटी विद्यापीठाच्या एरोस्पेस अभियांत्रिकी विभागात शिकवले. त्यांनी अपोलो १३ अपघाताच्या चौकशीत आणि स्पेस शटल चॅलेंजर दुर्घटनेची चौकशी करणाऱ्या रॉजर्स आयोगावर काम केले. २०१२ मध्ये, वयाच्या ८२ व्या वर्षी, कोरोनरी बायपास शस्त्रक्रियेनंतर झालेल्या गुंतागुंतीमुळे आर्मस्ट्राँग यांचे निधन झाले .

आर्मस्ट्राँगचा जन्म ५ ऑगस्ट १९३० रोजी ओहायो राज्यातील ऑग्लेझ काउंटीमधील ग्रामीण वॉशिंग्टन टाउनशिपमध्ये झाला. तो व्हायोला लुईस (माहेरचे नाव एंजेल) आणि स्टीफन कोनिग आर्मस्ट्राँग यांचा मुलगा होता. तो जर्मन, इंग्लिश, स्कॉट्स-आयरिश, आयरिश आणि स्कॉटिश वंशाचा होता. तो आर्मस्ट्राँग कुळाचा वंशज आहे. त्याला जून नावाची एक धाकटी बहीण आणि डीन नावाचा एक धाकटा भाऊ होता. त्याचे वडील ओहायो राज्य सरकारमध्ये ऑडिटर होते, आणि हे कुटुंब पुढील १४ वर्षांत राज्यात वारंवार स्थलांतरित झाले आणि १६ शहरांमध्ये राहिले. याच काळात आर्मस्ट्राँगचे उड्डाणाबद्दलचे प्रेम वाढले, ज्याची सुरुवात वयाच्या दुसऱ्या वर्षी झाली जेव्हा त्याचे वडील त्याला क्लीव्हलँड एअर रेसेसमध्ये घेऊन गेले होते. तो पाच किंवा सहा वर्षांचा असताना, त्याने वॉरन, ओहायो येथे आपल्या पहिल्या विमान प्रवासाचा अनुभव घेतला, जेव्हा त्याने आणि त्याच्या वडिलांनी फोर्ड ट्रायमोटर (ज्याला ‘टिन गूज’ असेही म्हटले जाते) मध्ये प्रवास केला. आर्मस्ट्राँगने त्याच्या तरुणपणात मॉडेल विमाने बनवली आणि उडवली.

कुटुंबाचे शेवटचे स्थलांतर १९४४ मध्ये झाले आणि ते वापाकोनेटा येथे परतले, जिथे आर्मस्ट्राँगने ब्लूम हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले आणि वापाकोनेटा एअरफिल्डवर उड्डाणाचे धडे घेतले. त्याने त्याच्या १६ व्या वाढदिवशी विद्यार्थी उड्डाण प्रमाणपत्र मिळवले, त्यानंतर ऑगस्टमध्ये एकट्याने उड्डाण केले, हे सर्व त्याने ड्रायव्हरचा परवाना मिळण्यापूर्वीच केले. तो एक सक्रिय बॉय स्काउट होता आणि त्याने ईगल स्काउटचा दर्जा मिळवला. प्रौढ झाल्यावर, स्काउट्सनी त्याला त्यांच्या डिस्टिंग्विश्ड ईगल स्काउट अवॉर्ड आणि सिल्व्हर बफेलो अवॉर्डने सन्मानित केले. १८ जुलै, १९६९ रोजी चंद्राकडे उड्डाण करत असताना, त्याने आयडाहो येथील नॅशनल स्काउट जॅम्बोरीमधील उपस्थितांना शुभेच्छा पाठवल्या. चंद्रावर जाताना आणि परत येताना त्याने सोबत नेलेल्या काही वैयक्तिक वस्तूंमध्ये वर्ल्ड स्काउट बॅजचा समावेश होता.

वयाच्या १७ व्या वर्षी, १९४७ मध्ये, आर्मस्ट्राँगने इंडियानामधील वेस्ट लाफायेट येथील पर्ड्यू विद्यापीठात एरोनॉटिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास सुरू केला ; तो त्याच्या कुटुंबातील महाविद्यालयात जाणारा दुसरा व्यक्ती होता. आर्मस्ट्राँगला मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी) मध्ये देखील प्रवेश मिळाला होता, परंतु १९४५ मध्ये ओहायो स्टेडियममध्ये पर्ड्यू बॉईलमेकर्स आणि ओहायो स्टेट बकयेज यांच्यातील फुटबॉल सामना पाहिल्यानंतर त्याने पर्ड्यूला जाण्याचा निश्चय केला, ज्यामध्ये क्वार्टरबॅक बॉब डीमॉसने बॉईलमेकर्सला अत्यंत प्रतिष्ठित बकयेजवर एक मोठा विजय मिळवून दिला होता. एमआयटीमध्ये शिकलेल्या त्याच्या एका काकांनी त्याला असाही सल्ला दिला होता की, मॅसॅच्युसेट्समधील केंब्रिजला न जाताही त्याला चांगले शिक्षण मिळू शकते. त्याच्या महाविद्यालयाची शिक्षण फी हॉलोवे योजनेअंतर्गत भरण्यात आली होती. यशस्वी अर्जदारांनी दोन वर्षांचा अभ्यास, त्यानंतर दोन वर्षांचे उड्डाण प्रशिक्षण आणि अमेरिकन नौदलात वैमानिक म्हणून एक वर्षाची सेवा आणि मग त्यांच्या पदवीच्या शेवटच्या दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची वचनबद्धता दर्शवली. आर्मस्ट्राँगने नौदल विज्ञानाचे अभ्यासक्रम घेतले नाहीत, तसेच तो नौदल राखीव अधिकारी प्रशिक्षण दलातही सामील झाला नाही. २६ जानेवारी १९४९ रोजी आर्मस्ट्राँगला नौदलातून बोलावण्यात आले, ज्यामुळे त्याला वर्ग ५-४९ सह उड्डाण प्रशिक्षणासाठी फ्लोरिडातील नेव्हल एअर स्टेशन पेन्साकोला येथे हजर व्हावे लागले. वैद्यकीय परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, तो २४ फेब्रुवारी १९४९ रोजी मिडशिपमन बनला. त्याने ९ सप्टेंबर १९४९ रोजी एकट्याने उड्डाण केले.

७ ऑगस्ट २०१२ रोजी, आर्मस्ट्राँगवर ओहायोच्या फेअरफिल्ड येथील मर्सी हेल्थ फेअरफिल्ड हॉस्पिटलमध्ये कोरोनरी आर्टरी डिसीजपासून आराम मिळवण्यासाठी बायपास शस्त्रक्रिया करण्यात आला. जरी ते बरे होत असल्याची बातमी होती, तरी गुंतागुंत निर्माण झाली आणि २५ ऑगस्ट २०१२ रोजी त्यांचे निधन झाले.

## सार्वजनिक विद्यापीठात कंत्राटी प्राध्यापक भरतीत आवेदन शुल्क आकारण्याबाबत नियमावली हवी

### प्रा. डॉ. संजय खडक्कार यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

महाराष्ट्रातील सार्वजनिक विद्यापीठांत सहाय्यक प्राध्यापकांच्या रिक्त पदांवर, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान न होण्यासाठी,कंत्राटी पद्धतीने सहायक प्राध्यापक भरती प्रक्रिया राबविली जाते. यामध्ये आवेदन शुल्क आकारण्या बाबतीत नियमावली असावी या संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूरचे माजी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. संजय खडक्कार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले आहे.

नुकतेक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ इत्यादी सार्वजनिक विद्यापीठे विद्यापीठांच्या कंत्राटी पद्धतीने सहायक प्राध्यापक भरतीच्या जाहिराती प्रकाशित झाल्यात. त्यात मुक्त विद्यापीठ,पुणे विद्यापीठ यांनी आवेदन शुल्क १००० रुपये तर नागपूर विद्यापीठाने ५०० रुपये ठेवले आहे.

उच्च शिक्षणात करिअर करण्यासाठी आज मोठ्या प्रमाणात विद्यार्थी नेट/सेट/पीएचडी होताना दिसतात. परंतु मंजूर सहायक प्राध्यापकांची संख्या निश्चितच पात्र उमेदवारांच्या मानाने खूपच कमी असते. त्यामुळे प्रत्येक कंत्राटी सहायक प्राध्यापक पदासाठी किमान १०० च्या वर उमेदवार पात्र असताना दिसतात. त्यामुळे प्रत्येक उमेदवाराकडून १ हजार रुपये घेतल्यास, प्रत्येक पदासाठी विद्यापीठ आवेदन शुल्कापोटी लाखों रुपये मिळतात. या वर्षी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने ५५ जागा भरल्या, एका पदासाठी किमान १०० अर्ज आले असतील तर आवेदन शुल्कापोटी किमान ५५ लाख रुपये मुक्त विद्यापीठाने कमावले असतील,असा अंदाज आपण करू शकतो.

कंत्राटी तत्त्वावरील पदे ही केवळ ६ ते ११ महिन्यांच्या अत्यंत अल्प कालावधीसाठी असतात.* कोणतीही नोकरीची शाश्वती किंवा सुरक्षा नसताना, बेरोजगार असलेल्या नेट/सेट/पीएचडी धारक उमेदवारांकडून १,०००/- रुपये शुल्क वसूल करणे नैतिकदृष्ट्या अत्यंत चुकीचे आहे.केवळ अर्जांची छाननी आणि मुलाखतीच्या खर्चाचे कारण पुढे करून गरिबांच्या मुलांकडून शुल्क वसूल करणे अनाकलनीय आहे.

महाराष्ट्र शासनाने सरळसेवा/कायमस्वरूपी भरतीसाठी परीक्षा घेणाऱ्या कंपन्यांच्या शुल्कापोटी १,०००/- रुपयांची मर्यादा निश्चित केली आहे. कंत्राटी पदांसाठी कोणतीही मोठी परीक्षा घेतली जात नाही,तरी विद्यापीठ प्रशासन याच शासन निर्णयाचा चुकीचा आधार घेऊन तात्पुरत्या पदासाठीही तेवढीच फी लादत आहे.

राज्यातील उच्चशिक्षित तरुण एकाच वेळी अनेक विद्यापीठांमध्ये अर्ज करत असतात. प्रत्येक ठिकाणी १,०००/- रुपये फी आणि मुलाखतीसाठी प्रवासाचा खर्च जोडल्यास, *बेरोजगारांना हजारो रुपयांचा नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे.*

तरी आपल्याला नम्र विनंती की विद्यापीठातील कंत्राटी आणि तात्पुरत्या स्वरूपाच्या सहायक प्राध्यापक व इतर सर्व भरती प्रक्रियासाठी अर्ज शुल्क पूर्णपणे रद्द करण्यात यावे, किंवा प्रशासकीय खर्च म्हणून केवळ १०० रुपये ते २०० रुपयांचे नाममात्र शुल्क आकारण्यात यावे, व राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांसाठी या बाबत नियमावली बनवावी,असे निर्देश संबंधितांना द्यावे असे प्रा.डॉ.संजय त्रिंबकराव खडक्कार यांनी ४ ऑगस्ट च्या पत्रात नमूद केले आहे.

## आजच्या दिवशी जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा झाला होता रद्द!

५ ऑगस्ट २०१९ रोजी, भारत सरकारने जम्मू आणि काश्मीरला भारतीय संविधानाच्या कलम ३७० अंतर्गत दिलेला विशेष दर्जा, किंवा स्वायत्तता रद्द केली. हा प्रदेश भारताद्वारे एक राज्य म्हणून प्रशासित आहे आणि त्यात काश्मीरचा मोठा भाग समाविष्ट आहे जो १९४७ पासून भारत, पाकिस्तान आणि चीन यांच्यात वादाचा विषय राहिला आहे.

रद्द करण्यासोबत भारत सरकारने केलेल्या कारवाईमध्ये काश्मीर खोऱ्यातील दळणवळण बंद करणे समाविष्ट होते, जे ५ महिन्यांनंतर पूर्ववत करण्यात आले. कोणताही उठाव रोखण्यासाठी हजारो अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आले होते. माजी मुख्यमंत्र्यांसह अनेक प्रमुख काश्मिरी राजकारण्यांना ताब्यात घेण्यात आले. सरकारी अधिकाऱ्यांनी हे निर्बंध हिंसाचार टाळण्यासाठी असल्याचे वर्णन केले, आणि राज्यातील लोकांना आरक्षण, शिक्षणाचा अधिकार आणि माहितीचा अधिकार यांसारख्या सरकारी योजनांचा लाभ घेता यावा यासाठी हे रद्द करण्याचे समर्थन केले. काश्मीर खोऱ्यातील प्रतिक्रिया दळणवळण स्थगित करून आणि संचारबंदी ( कलम १४४ ) लागू करून प्रभावीपणे दडपण्यात आल्या.




हिंदू-बहुल जम्मू आणि बौद्ध-बहुल लडाख प्रदेशातील लोकांनी या निर्णयाचे स्वागत केले आणि त्याच्या समर्थनार्थ उत्सव साजरे केले, तथापि, नंतरच्या प्रदेशातील मुस्लिमांकडून काही विरोध झाल्याचेही वृत्त आहे. अनेक राष्ट्रवाद्यांनी हा निर्णय काश्मीरमध्ये सार्वजनिक सुव्यवस्था आणि समृद्धीची नांदी ठरेल असे घोषित करून आनंद साजरा केला. भारतातील राजकीय पक्षांमध्ये, सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने आणि इतरांबरोबरच बहुजन समाज पक्ष , आम आदमी पक्ष , एआयएडीएमके , तेलगू देसम पक्ष , वायएसआर काँग्रेस पक्ष , बीजेडी , जनता दल (युनायटेड) आणि शिवसेना यांनी हा निर्णय रद्द करण्यास पाठिंबा दिला . त्याला भारतीय राष्ट्रीय काँग्रेस , जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स , जम्मू आणि काश्मीर पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी , भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) , भारतीय कम्युनिस्ट पक्ष , तृणमूल काँग्रेस आणि डीएमके यांनी विरोध केला होता .

भारताच्या राष्ट्रपतींनी अनुच्छेद ३६७ च्या अधिकाराखाली एक आदेश जारी केला, ज्याद्वारे १९५४ चा प्रचलित राष्ट्रपती आदेश रद्द करण्यात आला आणि राज्याला देण्यात आलेल्या स्वायत्ततेच्या सर्व तरतुदी रद्दबातल ठरवण्यात आल्या. गृहमंत्री यांनी भारतीय संसदेत एक पुनर्रचना विधेयक सादर केले, ज्याद्वारे राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजन करून त्यावर नायब राज्यपाल आणि एकसदनीय विधानमंडळाद्वारे शासन करण्याची मागणी करण्यात आली. अनुच्छेद ३७० अंतर्गत तात्पुरता विशेष दर्जा रद्द करण्याची मागणी करणारा ठराव आणि राज्याच्या पुनर्रचनेचे विधेयक ५ ऑगस्ट २०१९ रोजी राज्यसभेत – भारताच्या संसदेचे वरिष्ठ सभागृह – चर्चेसाठी मांडण्यात आले आणि मंजूर करण्यात आले. ६ ऑगस्ट रोजी, लोकसभेत – भारताच्या संसदेचे कनिष्ठ सभागृह – पुनर्रचना विधेयकावर आणि दर्जा रद्द करण्याची शिफारस करणाऱ्या ठरावावर चर्चा करून ते मंजूर करण्यात आले.

भारतीय संविधानाच्या कलम ३७० ने जम्मू आणि काश्मीरला विशेष दर्जा दिला — हे भारतीय उपखंडाच्या उत्तर भागात वसलेले एक राज्य आहे आणि मोठ्या काश्मीर प्रदेशाचा एक भाग आहे , जो भारत, पाकिस्तान आणि चीन यांच्यातील वादाचा विषय राहिला आहे. या कलमाने जम्मू आणि काश्मीरला स्वतंत्र संविधान , राज्याचा ध्वज आणि राज्याच्या अंतर्गत प्रशासनावर स्वायत्तता ठेवण्याचा अधिकार दिला. जम्मू आणि काश्मीरच्या संविधान सभेला , तिच्या स्थापनेनंतर, राज्याला लागू होणाऱ्या भारतीय संविधानाच्या कलमांची शिफारस करण्याचा किंवा कलम ३७० पूर्णपणे रद्द करण्याचा अधिकार देण्यात आला. राज्याच्या संविधान सभेशी सल्लामसलत केल्यानंतर, १९५४ चा राष्ट्रपती आदेश जारी करण्यात आला, ज्यामध्ये राज्याला लागू होणाऱ्या भारतीय संविधानाच्या कलमांचा उल्लेख होता. संविधान सभेने कलम ३७० रद्द करण्याची शिफारस न करता स्वतःला विसर्जित केले, आणि हे कलम भारतीय संविधानाचे कायमस्वरूपी वैशिष्ट्य बनले आहे असे मानले गेले. या कलमाने, कलम ३५ ए सह , असे परिभाषित केले की जम्मू आणि काश्मीर राज्यातील रहिवासी इतर भारतीय राज्यांतील रहिवाशांच्या तुलनेत नागरिकत्व , मालमत्तेची मालकी आणि मूलभूत हक्कांशी संबंधित कायद्यांसह, कायद्यांच्या वेगळ्या संचाअंतर्गत राहतात.

१९५४ ते २०११ दरम्यान, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखालील विविध केंद्र सरकारांच्या आणि नॅशनल कॉन्फरन्ससारख्या स्थानिक पातळीवर निवडलेल्या राज्य सरकारांच्या काळात, भारताने कलम ३७० च्या तरतुदींचा वापर करून, राज्य सरकारच्या संमतीने जम्मू आणि काश्मीरमध्ये भारतीय संविधान लागू करण्यासाठी आणि राज्याची स्वायत्तता कमी करण्यासाठी राष्ट्रपतींचे आदेश जारी केले. कलम ३७० अंतर्गतचे हे पूर्वीचे राष्ट्रपतींचे आदेश वादग्रस्त असून ते काश्मीर विवादाचा विषय आहेत. काश्मीरचे अभ्यासक आणि राज्यशास्त्रज्ञ सुमंत्र बोस , १९५३-६३ या काळातील राजकारणाचा सारांश या शब्दांत मांडतात, ज्या दरम्यान बक्षी गुलाम मोहम्मद यांनी जम्मू आणि काश्मीरचे पंतप्रधान म्हणून काम केले.

बक्षी गुलाम मोहम्मद यांचा कार्यकाळ ऑक्टोबर १९६३ पर्यंत, पूर्ण दशकभर चालला. त्या दशकातील घटनाक्रमावरून बक्षी आणि भारत सरकार यांच्यात एक करारबद्ध संबंध असल्याचे स्पष्टपणे सूचित होते, ज्यानुसार नवी दिल्लीच्या अटींवर जम्मू आणि काश्मीरचे भारतात ‘एकीकरण’ सुलभ करण्याच्या बदल्यात त्यांना श्रीनगरमध्ये एक अप्रतिनिधिक, उत्तरदायित्व नसलेले सरकार चालवण्याची परवानगी दिली जाणार होती. याचे दुहेरी परिणाम झाले: जम्मू आणि काश्मीरमधील कायद्याचे राज्य आणि लोकशाही संस्थांचे खच्चीकरण; आणि जम्मू आणि काश्मीरच्या स्वायत्ततेची घसरण, जी (अनुच्छेद ३७० नुसार) जम्मू आणि काश्मीरच्या सरकारच्या ‘संमतीने’ साध्य झाली होती—ज्यात नवी दिल्लीच्या आश्रित राजकारण्यांच्या एका संमिश्र गटाचा समावेश होता.पुढे, बोस यांच्या मते, १९५४ चा राष्ट्रपतींचा आदेश आणि त्यानंतरच्या आदेशांनी ‘अनुच्छेद ३७० चा अंत’ सुरू केला आणि तेव्हापासून ते ‘अक्षरशः आणि भावनेने प्रभावीपणे मृत झाले आहे’.

भारत आणि पाकिस्तानची धार्मिक आधारावर फाळणी झाल्यापासून, जम्मू आणि काश्मीरसह भारतातील हिंदू राष्ट्रवादी संघटनांनी असे म्हटले आहे की जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अविभाज्य, अतूट भाग आहे. सत्यापनासाठी अवतरण आवश्यक आहे. पूर्वीच्या निवडणूक जाहीरनाम्यांप्रमाणेच, भारतीय जनता पक्षाने २०१९ च्या भारतीय सार्वत्रिक निवडणुकीसाठी आपल्या प्रचाराच्या आश्वासनांमध्ये जम्मू आणि काश्मीरच्या एकीकरणाचा समावेश केला होता . भाजपने आणि त्यांच्या मित्रपक्षांनी भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह असलेल्या लोकसभेत प्रचंड बहुमत मिळवले.

# साताऱ्यात प्रतिसरकारची स्थापना करणारे क्रांतिकारक!

क्रांतिसिंह नाना पाटील हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील सैनिक आणि स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी राजकारणी होते. क्रांतिसिंह नाना पाटील हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे क्रांतिकारक मानले जातात. त्यांचे कार्यक्षेत्र हे प्रामुख्याने सांगली, सातारा या परिसरामध्ये होते.

नाना पाटील यांच्या वरती प्रारंभीच्या काळात सत्यशोधक विचारांचा प्रभाव होता. पुढील काळात ब्रिटिशांच्या अन्याय कारक राजवटीस आव्हान देण्यासाठी त्यांनी क्रांतिकारक मार्गाचा पुरस्कार केला. साताऱ्यातील प्रतिसरकारच्या स्थापनेत त्यांचा वाटा महत्त्वाचा होता. नाना पाटील यांनी साताऱ्यामध्ये प्रतिसरकारची स्थापना करून महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीला मोठे योगदान दिले. भूमिगत चळवळीच्या माध्यमातून त्यांनी प्रतिसरकारची स्थापना केली. प्रतिसरकारची स्थापना झाल्यावर ग्रामीण भागात ब्रिटिशांचे अस्तित्व नाममात्र राहिले. नाना पाटील यांनी युवकांची संघटना स्थापन करून इंग्रजांपुढे जबरदस्त आव्हान निर्माण केले. प्रती सरकारचे नेते या नात्याने त्यांनी केलेल्या कार्यामुळेच त्यांना क्रांतिसिंह म्हणून ओळखले जाऊ लागले. महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीच्या भूमिगत कार्यकर्त्यांमध्ये नाना पाटलांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. या काळामध्ये महाराष्ट्रातील सातारा, सांगली या परिसरात नाना पाटलांची ब्रिटिशांवर एक मोठी दहशद निर्माण झाली होती. प्रतिसरकार अथवा ‘पत्री सरकार’ म्हणून या काळात ते ओळखले गेले. मंत्र प्राप्तीनंतर हे नाना पाटील यांनी सातारा सांगली परिसरामध्ये आपले सामाजिक कार्य पुढे चालू ठेवले.

महाराष्ट्रात (प्रामुख्याने सातारा, सांगली भागात) स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणारे, तसेच पत्री सरकार किंवा प्रतिसरकार हा समांतर शासनाचा एकमेवाद्वितीय प्रयोग राबवणारे लढवय्ये राजकीय कार्यकर्ते म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील होत. नाना पाटील यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील बहे या गावी ३ ऑगस्ट १९०० रोजी त्यांचे मामा कै.भाऊ बाळा मुसळे यांच्या घरी झाला. लहानपणापासूनच नानांना दणकट शरीराचे वरदान लाभले होते. म्हणूनच पुढील काळातही त्यांच्या भारदस्त व्यक्तिमत्वामुळेच लोक त्यांच्याकडे आकर्षित होत. नाना पाटील यांचे गाव येडेमच्छिंद्र तर कर्मभूमी संपूर्ण महाराष्ट्र होती. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नानांनी काही काळ तलाठी म्हणून नोकरी केली. पण समाजकारण व राजकारणाची ओढ असलेले नाना लवकरच नोकरीतून बाहेर पडले. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीपासूनच त्यांचा स्वातंत्र्य लढ्यात सहभाग होता. स्वातंत्र्यलढा आणि बहुजन समाजाचा विकास या दोन्ही मार्गांनी त्यांचे कार्य चालू होते.



क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती

१९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीचे कार्य करण्यासाठी नाना पाटलांनी नोकरीचा त्याग केला. त्यांनी ग्रामीण जनतेला गुलामगिरीची जाणीव करून देऊन, जनतेला धाडसी बनवण्याचा प्रयत्न केला. नानांवर वारकरी संप्रदायाचा प्रभाव होता. तसेच लोकांच्या भाषेत प्रभावी भाषणे करून, त्यांच्यात प्रेरणा उत्पन्न करण्याची हातोटी नानांकडे होती. ग्रामीण भागातील, बहुजन समाजातील लोकांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेणे हे क्रांतिसिंहांचे प्रमुख योगदान होय. ब्रिटिश शासनाला समांतर अशी शासन यंत्रणा उभी केली पाहिजे असा नाना पाटलांचा विचार होता. ‘आपुला आपण करू कारभार’ हे सूत्र त्यांनी इ.स. १९४२च्या चले जाव चळवळीत प्रत्यक्ष अंमलात आणले. आपल्या देशाचा कारभार आपणच केला पाहिजे या जाणिवेतून प्रतिसरकार ही संकल्पना नानांनी प्रत्यक्षात आणली होती. प्रतिसरकारच्या माध्यमातून लोकन्यायालये, अन्नधान्य पुरवठा, बाजार व्यवस्था यासारखी लोकोपयोगी कामे केली जात. ब्रिटिशांची राज्यव्यवस्था नाकारून त्यांनी १९४२ च्या दरम्यान सातारा जिल्ह्यात स्वतंत्र राज्याची स्थापना केली. प्रतिसरकारचा प्रचार ज्येष्ठ कवी ग. दि. माडगुळकर लिखित पोवाड्यांच्या माध्यमातून आणि शाहीर निकम यांच्या खड्या आवाजाद्वारे केला जात होता.

नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारमध्ये विविध दलांची स्थापना झाली. त्यातल्या एका दलाचे-तुफान दलाचे-फील्ड मार्शल जी.डी. लाड (बापू) आणि कॅप्टन आकाराम (दादा) पवार होते. ह्या दलाची कुंडल येथे युद्धशाळा होती. या युद्धशाळेतून प्रशिक्षित अशा पाच हजारांवर जवानांच्या दोनशे शाखा स्वातंत्र्यपूर्व काळात गावोगाव काम करीत. तलवारी, जांबिया या परंपरागत हत्याराबरोबरच पिस्तूल बॉबगोळे फेकण्याचे प्रशिक्षण या जवानांना होते. प्रतिसरकारने गावटग्यांवर बसवलेल्या दहशतीमुळे या सरकारची पत्री सरकार अशी ओळख तयार झाली. या प्रतिसरकारच्या माध्यमातून बाजारव्यवस्था, अन्नधान्य पुरवठा, भांडणतंटे सोडवण्यासाठी लोकन्यायालयांची स्थापना, दरोडेखोरांना-पिळवणूक करणाऱ्या सावकारांना -पाटलांना कडक शिक्षा - अशी अनेक समाजोपयोगी कामे करण्यात येत होती. या सरकार अंतर्गत नाना पाटील यांनी ‘तुफान सेना’ या नावाने सैन्य दलाची स्थापना केली होती. ब्रिटिशांच्या रेल्वे, पोस्ट आदी सेवांवर हल्ला करून त्यांना नामोहरम करण्याचे तंत्रही नाना पाटील यांनी यशस्वीरीत्या राबवले. १९४३ ते १९४६ या काळात सातारा व सांगली जिल्ह्यातील सुमारे १५०० गावांत प्रतिसरकार कार्यरत होते. या संकल्पनेचा प्रयोग पुढे देशातही अनेक ठिकाणी करण्यात आला.

१९२० ते १९४२ या काळात नाना ८-१० वेळा तुरुंगात गेले. १९४२ ते ४६ या काळात ते भूमिगतच होते. ब्रिटिशांनी त्यांना पकडण्यासाठी बक्षीस लावले, जंगजंग पछाडले पण क्रांतिसिंह ब्रिटिशांना सापडले नाहीत. ते भूमिगत असताना ब्रिटिशांनी त्यांच्या घरावर जप्ती आणली, त्यांची जमीनही सरकारजमा केली. याच काळात त्यांच्या मातोश्रींचे निधन झाले. क्रांतिसिंहांनी आपला जीव धोक्यात घालून, धावपळीत मातोश्रींवर अंत्यसंस्कार केले होते. भारताला स्वातंत्र्य मिळणार हे नक्की झाल्यावरच (१९४६) क्रांतिसिंह कऱ्हाड तालुक्यात प्रकट झाले. त्यांच्यावर महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा तसेच राजर्षी शाहूंच्या कार्याचा प्रभाव होता. त्यांनी ‘गांधी -विवाह’ ही अतिशय कमी खर्चात विवाह करण्याची पद्धत रुजवण्याचा प्रयत्न केला, तसेच शिक्षण प्रसार, ग्रंथालयांची स्थापना, अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामीण जनतेची व्यसनमुक्ती या माध्यमातून समाजसुधारणेचे कार्य केले. त्यांच्यामुळे शाहीर निकम, नागनाथअण्णा नायकवडी यांसारखे कार्यकर्ते घडले.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रामुख्याने सांगली जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून सातत्याने प्रकाशात असणाऱ्या क्रांतिसिंहांचे ६ डिसेंबर इ.स. १९७६ वाळवा मध्ये निधन झाले. मला वाळव्यामधेच दहन करण्यात यावे ही त्याची इच्छा होती त्यानुसार वाळव्यामधेच दहन करण्यात आले.

३

सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# ग्रीन वसुंधरेतून नवोदय विद्यालयात उगवला हरित संकल्पाचा नवा सूर्य



## 'ग्रीन वसुंधा २०२६' वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ







प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला :** पीएसव्ही नर्चरी, जेसीआय अकोला सिटी आणि असोसिएशन ऑफ रिजनल ऑइल मिलर्स ऑफ अकोला (अरोमा असोसिएशन) आणि मिडिया पार्टनर RRC नेटवर्क यांच्या संयुक्त विद्यमाने 'ग्रीन वसुंधा २०२६' वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाची सुरुवात मंगळवारी (४ ऑगस्ट) सायंकाळी ४ वाजता शहरालगत ग्राम बाबुळगाव येथील नवोदय विद्यालय परिसरात जिल्हाधिकारी वर्षा मीणा यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी मीणा यांच्या हस्ते ग्रीन वसुंधा अभियानाच्या अधिकृत जिंगलचेही लोकार्पण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणाऱ्या या जिंगलमुळे अभियानाला प्रेरणादायी आणि भावनिक सुरुवात लाभली.

नवोदय विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहात परिसरात वृक्षारोपण करून हरित अभियानाला सुरुवात केली. या उपक्रमांतर्गत सहभागी विद्यार्थी आणि शाळांना 'ग्रीन वसुंधा'च्या वतीने मोफत रोपे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वृक्षारोपणासोबतच लावलेल्या झाडांचे संगोपन व संवर्धन करण्यावरही विशेष भर देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करून शहर व परिसर अधिक हिरवाईने नटविण्याचा या अभियानाचा उद्देश आहे. या प्रकल्पाच्या संचालिका डॉ. प्रिया वखारिया, ( जेसीआय अकोला सिटी, पीएसव्ही नर्चरी) संचालक लक्ष्मीकांत डागा (जेसीआय अकोला सिटी व अरोमा असोसिएशन) असून, ईश्वर गट्टाणी, वसुधा हॉस्पिटल आणि अरोमा असोसिएशन यांचे या अभियानाला आर्थिक सहकार्य लाभत आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भावनी शाह यांनी केले, तर आभार सचिव अभय राठी यांनी मानले. अभियानाच्या यशस्वीतेसाठी जेसीआय अकोला सिटीचे अध्यक्ष अमोल अग्रवाल, डॉ. दीपक वखारिया, डॉ. संकेत वखारिया, संजय श्रावगी, नितीन भारूका, आनंद अग्रवाल, संदीप अग्रवाल, गौतम श्रावगी, सुमित बंसल, संकल्प गजघाटे, जयेश लगड, रेवती ढोरे, ज्ञानेश्वरी बनकर, सीए रजनी कलंत्री, पलक खंडेलवाल, डॉ. सुचिता मोहता, सीए पायल गट्टाणी, सीए निधी लदनिया, पूजा अग्रवाल, आर्कि. चंचल राठी, ॲड. वर्षा लाहोटी, अपूर्वा पडगिलवार, मेघा राठी, स्मिता डागा, ममता मुंदडा, श्वेता लाहोटी, अनोखी झुनझुनवाला, सीए कोमल मालाणी, विशाखा धूत, मोनिका राठी, सीए पंकज लदनिया, समीर शाह, माजी उपमहापौर निखिलेश दिवेकर, पल्लवी दिवेकर, मोहम्मद झुबेर, मोहम्मद तारीक यांच्यासह जेसीआय अकोला सिटी, पीएसव्ही नर्चरी आणि अरोमा असोसिएशनचे पदाधिकारी व स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत.

## बाबूजी देशमुख वाचनालय वक्तृत्व स्पर्धा शालेय गटात आयुषी दामोदर, महाविद्यालय गटात हेमलता पवार प्रथम पुरस्काराचे मानकरी



प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला :** बाबूजी देशमुख वाचनालयाचे वतीने आयोजित लोकमान्य टिळक वक्तृत्व स्पर्धेत शालेय गटात आर डी जी पब्लिक स्कूल ची आयुषी दामोदर व महाविद्यालय गटात एल आर टी कॉलेजची हेमलता राजू पवार प्रथम पुरस्काराचे मानकरी ठरले. बाबूजी देशमुख वाचनालयाचे अध्यक्ष महादेवराव भुईभार , सचिव अनुराग मिश्रा व बबनराव कानकिरड यांचे प्रमुख उपस्थितीत रनिंग ट्रॉफी,स्मृतीचिन्ह देवुन सन्मानित करण्यात आले. शालेय गटात द्वितीय क्रमांक कृष्णा धोरण (प्रभात किड्स), तृतीय-हशार्वी राजेश ओइंबे(कोठारी कॉन्व्हेंट),महाविद्यालय गटात द्वितीय क्रमांक- प्राची रामदास इंगळे (बाबासाहेब आपोतीकर अध्यापक महाविद्यालय आपोती) यांना पारितोषिक देवुन सन्मानित करण्यात आले. प्रा.डॉ.रामप्रकाश वर्मा यांनी वक्तृत्व स्पर्धेतील भाषणाचा विषय,मांडणी व सादरीकरण कसे करायचे यासंबंधी मार्गदर्शन केले.लोकमान्य टिळकांचे विचार आजच्या तरुणाई ने आत्मसात करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन महादेवराव भुईभार यांनी समारोप प्रसंगी केले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.डॉ.रामप्रकाश वर्मा,प्रा. डॉ. विवेक हिवरे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा.मोहन खडसे यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी ग्रंथपाल सुरेश टेके,सतिश डगवाल, जुगल शिरसाठ, नितीन कदम,स्वप्नील ताथोड, नितीन कदम,सुनील मिश्रा यांनी परिश्रम घेतले.

## अकोल्यात उद्या एमएसएमई मंत्रालयातर्फे वेंडर डेव्हलपमेंट प्रोग्रामचे आयोजन

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला :** भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय ,अंतर्गत एमएसएमई-विकास व सुविधा कार्यालय, नागपूरच्या वतीने अकोला जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी ६ व ७ ऑगस्ट २०२६ रोजी दोन दिवसीय वेंडर डेव्हलपमेंट प्रोग्राम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे उद्‌घाटन ६ रोजी सकाळी ११.०० वाजता हॉटेल व्ही. एस. बाळापूर रोड येथे होणार आहे. या कार्यक्रमास एमएसएमई-डीएफओ, नागपूरचे संचालक श्री. व्ही. आर. शिरसाट, अकोल्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीणा (IAS), महाबीजचे एमडी दिलीप स्वामी, प्रादेशिक अधिकारी, MIDC अकोला राजेंद्र जाधव, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र एस. सी. बनसोड, फेडरेशन ऑफ कॉमर्स इंडस्ट्रियल असोसिएशनचे चेअरमेन सुरेश काबरा, कॅट विदर्भचे महामंत्री निकेश गुप्ता, अकोला इंडस्ट्रीज असोसिएशन अध्यक्ष मनोज खंडेलवाल, लघु उद्योग भारती अध्यक्ष पंकज बियाणी तसेच अकोला विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष नीरव वोरा यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी व उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

एमएसएमई-विकास व सुविधा कार्यालय, नागपूर यांनी अकोला जिल्ह्यातील सर्व उद्योगपती, उद्योजक, उत्पादक, स्टार्टअप्स व व्यावसायिकांना या महत्त्वपूर्ण कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन भारत सरकारच्या विविध योजनांचा व नवीन व्यावसायिक संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## बगीच्यातील दुर्गंधी दूर करून अतिक्रमणाचा सफाया करा

**हिवरखेड :** स्थानिक बगीच्या प्लॉट मधील घाणकचरा व अतिक्रमण काढून स्वच्छता मोहीम राबवा जेणेकरून नागरिकाचा त्रास कमी होईल ,या आमच्या बगीच्या प्लॉट मध्ये मोठ्या प्रमाणात आमच्या संताच्या दर्गाह जवळ ोठ्या प्रमाणात घ ा णकचरा साचलेला आहे, यामुळे मोठ मोठे मच्छर, डांस, व विषारी प्राणी आसरा घेतात, तसेच येथे राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न सुद्धा ऐरणीवर आला असल्याचे दिसून येत आहे या प्लॉट मध्ये अतिक्रमण वाढले आहे, शाळकरी विद्यार्थी व शेतकरी यांना या मार्गावर ये जा करण्यास मोठी कसरत करावी लागते याबाब सबंधित नगरपरिषदला ही समस्या तत्काळ सोडवण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते मोईज जमादार यांनी केली आहे.

## चिमूरड्या कृष्णाई भिरडने दिला पर्यावरणाचा संदेश

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला :** कृष्णाई ग्रीन वसुधा धारा आयोजित वृक्षारोपण प्रतियोगिता भाग घेतलेल्या सर्वात छोटी चिमुरडे अर्थात कृष्णाई भिरड ने पर्यावरणाच्या संदेश देणाऱ्या स्पर्धेत भाग घेऊन सर्वांनाच अचंबित केले. एवढ्या लहान वयातच तिचे पर्यावरण संरक्षणावरील प्रेम पाहून स्पर्धेत सामील अन्य स्पर्धकांनी तिचे कौतुक केले पर्यावरणाबद्दल तिचे जागरूकता आणि समर्पण पाहून सर्वांनीच प्रेरणा घ्यावी अशा शब्दात आयोजकांनी तिचा गौरव करीत तिला पर्यावरण दूत म्हणून संबोधित केले कृष्णाई भिरड शहरातील प्रसिद्ध चार्टर्ड अकाउंट सपना भिरड यांची कन्या आहे. याप्रसंगी तिने आपले मनोगत



व्यक्त करताना म्हटले की आपण सर्वांनीच निसर्गावर प्रेम करायला शिकले पाहिजे तसेच वृक्षतोड थांबवून व वृक्षारोपण सारख्या मोहिमा राबवून भूमातेला हरित भूमी मध्ये परिवर्तित करणे ही काळाची गरज झाली आहे तिच्या या छोटेखानी संदेशाचे उपस्थित सर्वांनीच टाळ्या वाजवून जोरदार स्वागत केले

## जीएमसीतील सीएमओंवर उद्धट वर्तनाचा आरोप

### महिला सफाई कर्मचाऱ्याची अधिष्ठात्यांकडे लेखी तक्रार

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला :** अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातील (जीएमसी) मुख्य वैद्यकीय अधिकारी (सीएमओ) डॉ. पुष्पोत्तम यांच्या विरोधात एका महिला सफाई कर्मचाऱ्याने उद्धट व अपमानास्पद वर्तन केल्याचा गंभीर आरोप करत अधिष्ठातांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित अधिकाऱ्यावर सात दिवसांच्या आत कारवाई करण्याची मागणीही तिने केली आहे.

तक्रारदार आशा शेख बशीर, या जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत असून, त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ४ ऑगस्ट २०२६ रोजी आपल्या मुलाला जुलाबाचा त्रास होत असल्याने उपचारासाठी अपघात विभागात नेले. त्यावेळी ओपीडी बंद असल्याने त्यांनी ड्युटीवरील सीएमओ डॉ. पुष्पोत्तम यांच्याकडे उपचाराची विनंती केली. तक्रारीनुसार, सीएमओ यांनी त्यांना प्रथम वॉर्ड क्रमांक ४ मध्ये जाण्यास सांगितले. मात्र तेथे कोणताही डॉक्टर उपस्थित नव्हता. त्यानंतर



पुन्हा सीएमओंकडे जाऊन मुलाला सलाईन किंवा इंजेक्शन देण्याची विनंती केली असता, "तुझा मुलगा मरायला आला आहे का? मी सलाईन लावू शकत नाही. जिथे तक्रार करायची असेल तिथे कर," असे म्हणत अपमानास्पद भाषेत बोलल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच दुसऱ्या अधिकाऱ्याचा मोबाईल क्रमांक देत तेथे तक्रार करण्यास सांगितल्याचाही उल्लेख तक्रारीत आहे. तक्रारदार महिलेने आपण अनुसूचित जाती प्रवर्गातील असून आपल्या सोबत अपमानास्पद वर्तन करण्यात आल्याचा आरोप केला आहे. संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी त्यांनी अधिष्ठातांकडे केली आहे. तसेच, सात दिवसांच्या आत योग्य कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल.

## बँकांच्या चुकीमुळे हजारो शेतकरी कर्जमुक्ती योजनेपासून वंचित

### परस्पर कर्जाचे केले पुनर्गठन व नूतनीकरण

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**आलेगाव :** राज्यात कर्जमाफीचे बिगुल वाजले असले तरी अकोला जिल्ह्यातील हजारो शेतकरी लाभापासून वंचित आहेत. सन 2017 व 18 ला अनेक शेतकऱ्यांचे पीक कर्ज बँकांनी परस्पर पुनर्गठन व नूतनीकरण केले. त्यामुळे त्याही कर्जमाफी पासून अनेक शेतकरी वंचित राहिले होते.

आता अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेत सर्वांना न्याय मिळेल अशी अपेक्षा असतांना सरकारने मागील दोन्ही जुन्या कर्जमाफीपासून वंचीत राहलेल्या शेतकऱ्यांचा कुठलाही विचार न केल्याने अकोला जिल्ह्यासह राज्यातील अनेक शेतकरी फक्त आणि फक्त बँकांच्या चुकांमुळे वंचीत राहल्याचे वास्तव समोर आले असून या सर्व वंचीत राहलेल्या शेतकऱ्यांना सरकारने न्याय द्यावा अशी मागणी शेतकरी व शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.

सन 2012 ते 17,18 या कालावधीत अकोला जिल्ह्यात विशेषतः पातूर,बाळापूर तालुक्यात असे अनेक शेतकरी आहेत की ज्यांचे पीक कर्ज मुद्दल व व्याज यासह 2 लाख रु पेक्षा कमी होते, बँकांनी शेतकऱ्यांना न विचारता परस्पर सन 2016 ,17 ,18 ला अनेक शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे पुनर्गठन/नूतनीकरण केले आहे

त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे पीक कर्ज 2 लाख रु पेक्षा कमी होते,अशा शेतकऱ्यांचे बँकांनी परस्पर ,त्यांचे संमति शिवाय पीक कर्ज पुनर्गठन/नूतनीकरण केल्याने ते सर्व शेतकरी म.फुले कर्जमाफी योजना 2017 व छ. शिवाजी महाराज कर्जमुक्ती योजना 2019 मधून बँकांच्या चुकी मुळे वंचीत राहले आहेत. अशा शेतकऱ्यांना मागील दोन्ही व आताच्या कर्जमाफी योजनेचा लाभ जरी ते पात्र असले तरी मिळाला नाही , त्यामुळे सन 2017 च्या अगोदर मुद्दल व व्याज 2 लाख रु च्या पेक्षा कमी असणाऱ्या शेतकऱ्यांचे आतापर्यंतचे सर्व पीक कर्ज मुद्दल व व्याजासह 2 लाख रु पेक्षा कितीतरी पट जास्त झाले ते सर्वच पीक कर्ज माफ करण्यात यावे अशी मागणी होत आहे.

* बँकांचा NPA वाढल्याने बऱ्याच बँकांच्या झोनल व रिजनल कार्यालयातील वरिष्ठ *अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारची सूचना न देता,त्यांचा बॉण्ड,थंब,* स्वाक्षरी व संमती न घेता अशा हजारो शेतकऱ्यांचे नावे कर्जाचे परस्पर पुनर्गठन/नूतनीकरण केले असल्याचे गंभीर प्रकरणं लक्षात आले आहेत. ज्या ज्या बँकांनी शेतकऱ्यांची संमती न घेता परस्पर कर्जाचे पुनर्गठन/नूतनीकरण केले अशा सर्व बँका त्यांच्या रिजनल व झोनल कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांचेवर कायदेशीर कठोर कार्यवाही करावी व त्यांचेकडून कर्जमाफितून वंचीत ठेवलेल्या शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज वसूल करण्यात यावे,कारण बँकांच्या चुकीमुळे अनेक शेतकऱ्यांना परत कोणत्याही प्रकारचे कर्ज घेता आले नाही,त्यांचा सीबील खराब झालात्यामुळे त्यांना कर्जमुक्ती तर मिळाली नाहीच परंतु त्यांना परत नवीन कर्जासाठी कोणत्याही बँकेने कर्ज देऊ केले नाही.अनेक शेतकऱ्यांनी बँकांत कर्जमाफी बद्दल माहिती घेतली असता त्यांचे परस्पर पीक कर्ज या अगोदरच पुनर्गठन व नूतनीकरण झाल्याचे बँकांच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना सांगितले. बँकांच्या रिजनल व झोनल कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बँकावर दबाव टाकून शेतकऱ्यांच्या कर्जाचे जबरदस्तीने पुनर्गठन/नूतनीकरण केले ते बेकायदा आहे,त्यामुळे हजारो पात्र शेतकरी कर्जमाफी योजनेपासून वंचित आहेत. अकोला जिल्ह्यासह सम्पूर्ण राज्यात शेतकरी संघटनेचे वतीने मोठे जनआंदोलन करण्यात येईल असा इशारा विविध शेतकरी संघटनांनी दिला आहे.

> जिल्ह्यातील अनेक बँकांनी शेतकऱ्यांच्या संमती शिवाय पीक कर्जाचे परस्पर पुनर्गठन व नूतनीकरण केल्याने कर्जमाफीस पात्र असून सुद्धा हजारो शेतकरी तिन्ही कर्जमुक्ती योजनेपासून वंचित आहेत. त्यांचे सर्व कर्ज त्वरित माफ करावे तसेच ज्या ज्या बँकांच्या रिजनल व झोनल कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बँकांवर दबाव टाकून बेकायदा पुनर्गठन व नूतनीकरण करण्यास बँकांना भाग पाडले त्या सर्वांची उच्च स्तरीत समिती नेमून चौकशी करावी व अशा सर्व दोषी अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करावेत
>
> **विनोद शालिग्रामजी राऊत,**
> मळसुर

## न्यू तापडियानगर रेल्वेउड्डाण पुलाबाबत जय हनुमान ज्येष्ठ नागरिक सेवा संघाचे निवेदन

**अकोला :** न्यू तापडीया नगरला जोडुन असलेला रेल्वे उड्डाणपुल १० वर्षापासून अद्याप पूर्ण झालेला नाही. ही बाब अतिशय त्रासदायक आणि आर्थीकदृष्ट्या संकटात लोटणारी आहे. अंदाजे १०० कोटी रूपयाचे बांधकाम असलेल्या अंदाजपत्रकासाठी इतका कालावधी लागतो ही खूप लाजीरवाणी गोष्ट आहे. पुलाचे काम तातडीने पूर्ण होईल यासाठी आपण जातीने लक्ष घालावे अशी विनंती करून जिल्हाधिकारी यांना जय हनुमान ज्येष्ठ नागरिक सेवा संघाकडून निवेदन देण्यात आले.

सध्या जनतेला अकोट फाईल मधून फे-याने ये जा करावी लागते. आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. न्यू तापडीयानगरवासीयांच्या भावना लक्षात घेउन त्यांच्या समस्यांचे निवारण करावे अशी अपेक्षा करण्यात आली.

जय हनुमान जेष्ठ नागरिक सेवा संघाचे अध्यक्ष विजय गावंडे, सचिव मधुकर दळवी, उपाध्यक्ष सतीश देशमुख, कोषाध्यक्ष कमलाकर दुर्गे, उपसचिव गजानन मानकर, कार्यकारीणी सदस्य श्याम पाठक, अशोक मते, सुनिल देशमुख, विनायक सरदेशमुख, रमेश महल्ले, विजय पाथरे, सुरेश काळे, सुभाष राऊत, श्रीधरराव पागृत, गणेश मैराळ, सुरेशराव नांदुरकर, महिला सदस्य शकुंतलाबाई जोशी, सौ. अवंतिका मैराळ आदींनी हा महत्त्वाचा विषय लावून धरला आहे. निवेदन सादर करताना संघाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

## रस्ते चिखलाने माखले

**अकोला :** शहरातील तसेच ग्रामीण भागातील रस्ते चिखलाने माखले आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे. मुरूम टाकून जाण्या येण्याची सोय करून द्यावी अशी मागणी आहे. कारण सध्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. पावसाळ्याचे दिवस असल्याने जिकडे तिकडे चिखल दिसतो.

CHANGE IN NAME

WANT TO CHANGE ME AND MY FATHER NAM E FROM
**MO. SADIK A. RASHID**
-TO -
**MOHAMMAD SADIK ABDUL RASHID**
**ADRESS :** RAHEMAT NAGAR JUNI BASTI MURTIZAPUR DIST. AKOLA

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# तरुणाची हत्या; तीन आरोपी ताब्यात

## कोयत्याने केले वार; अशोकनगरातील घटना

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**यवतमाळ :** शहरातील अशोकनगर-फुकटनगर परिसरात पूर्ववैमनस्यातून २५ वर्षीय तरुणाची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करण्यात आली. ही घटना मंगळवारी (४ ऑगस्ट) रात्री घडली. या प्रकरणी पोलिसांनी दहा जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून, तिघांना ताब्यात घेतले आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. इन्नू उर्फ यनायत अली इरफान अली (वय २५, रा. अशोकनगर-फुकटनगर) असे मृत युवकाचे नाव आहे. या प्रकरणी सफीना सैय्यद अमन (वय २२) यांनी फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्या वादातून आरोपींनी संगनमताने इन्नू याच्यावर कोयता व इतर धारदार शस्त्रांनी हल्ला केला. गंभीर जखमी झालेल्या इन्नूचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

सफीना सैय्यद अमन वय २२ यानी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरुन पोलिसांनी या प्रकरणात सलीम शाह सुलेमान शाह (६०), तन्नु शाह अमिन शाह सागवान (२८), शकील शाह सलीम शाह (३०), सहजाद शाह सलीम शाह (३४), फैजल खान (२६), शाकीर उर्फ छोटू सादिक शेख (२२), समीर शाह नासीर शाह उर्फ लोफर (२१), मुज्जफर अली (५३), शोयब अली मुज्जफर अली (२८) आणि सम्मेक (२३) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, इतर आरोपींचा शोध सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच



शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार निलेश सुरडकर, डीबी पथक, फॉरेन्सिक पथक आणि वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाचा पंचनामा करून पुरावे संकलित करण्यात आले. तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे. या घटनेमुळे अशोकनगर-फुकटनगर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती नियंत्रणात असून, उर्वरित आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# सायबर फसवणुकीच्या 'म्युल अकाउंट' रॅकेटचा पर्दाफाश; मास्टरमाइंडसह तिघे जेरबंद

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**यवतमाळ:** सायबर फसवणुकीसाठी बँक खाती उपलब्ध करून देणाऱ्या 'म्युल अकाउंट' रॅकेटचा यवतमाळ शहर पोलिसांनी पर्दाफाश करत रत्नपाल ऊर्फ रतन जनार्धन कांबळे (रा. दाभडी), राहुल गजानन खंडारे (रा. दाभडी बोरगाव) आणि आदित्य मधुकर लांजेवार (रा. भोयर ले-आऊट, बुटीबोरी, नागपूर) या तिघांना अटक केली आहे. देशभरातील सहा नागरिकांची एकूण ६ लाख ९३ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक या प्रकरणात झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.



यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्याच्या तपासात रत्नपाल कांबळे याच्या बँक खात्याचा सायबर फसवणुकीसाठी वापर झाल्याचे समोर आले. त्याला अटक केल्यानंतर राहुल खंडारे याने खाते उघडण्यास मदत केल्याचे, तर आदित्य मधुकर लांजेवार हा संपूर्ण रॅकेटचा मास्टरमाइंड असल्याचे तपासात स्पष्ट झाले. पोलिस कारवाईची माहिती मिळताच राहुल पुण्याला, तर आदित्य राजस्थानात फरार झाला होता. तांत्रिक तपास व गुप्त माहितीच्या आधारे आदित्य लांजेवारला नागपूर येथून अटक करण्यात आली. चौकशीत त्याने संबंधित बँक खाते राजस्थानमधील एका डिलरला विकल्याची कबुली दिली. त्यानंतर यवतमाळात परतलेल्या राहुल खंडारेलाही पोलिसांनी अटक केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर, पोलीस उपनिरीक्षक निलेशकुमार मिश्रा तसेच भरत राठोड, रवि नेवारे, अंकुश फेंडर आणि धीरज घोसे यांच्या पथकाने केली. यवतमाळ शहर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणालाही आपले बँक खाते किंवा मोबाईल क्रमांक वापरण्यास देऊ नये. असे केल्यास संबंधित व्यक्तीवरही सायबर गुन्ह्यात सहभागी म्हणून कायदेशीर कारवाई केली जाईल.

# वीटभट्ट्या, हॉटेल्स-ची तपासणी होणार

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**यवतमाळ:** जिल्ह्यात बालकामगार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शहरी व ग्रामीण भागातील वीटभट्ट्या, हॉटेल्स व इतर आस्थापनांची तपासणी करावी, त्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी सरकारी कामगार अधिकाऱ्यांना दिले.

महसूल भवन येथे जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कामगार कायद्याची अंमलबजावणी, ई श्रम नोंदणी इत्यादी बाबींचा आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, सरकारी कामगार अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्हाधिकारी मीना यांनी जिल्ह्यात कामगार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देत कामगारांच्या सामाजिक संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले. शहरी व ग्रामीण भागातील वीटभट्ट्या, हॉटेल्स व इतर आस्थापनांधील बालकामगार व बालमजुरी रोखण्यासाठी विशेष मोहीम हाती घ्यावी.

# 'एक्सयूव्ही'तून देशी दारूची तस्करी; एक ताब्यात

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**यवतमाळ :** धामणगाव मार्गावरील मोहा परिसरात महेंद्रा एक्सयूव्हीमधून अवैधरित्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्या टोळीवर यवतमाळ शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण (डी. बी.) पथकाने धडक कारवाई करत ६ लाख ७० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून चालक पसार झाला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे डी.बी. पथकाने मोहा येथे सापळा रचला. एमएच ४९ बी ४५५० क्रमांकाची महेंद्रा एक्सयूव्ही अडविण्याचा प्रयत्न करताच चालक वाहन सोडून फरार झाला. मात्र, वाहनातील हिमांशु चिंतामन किनाके



(वय २४, रा. अहिल्या नगर, लोहारा, यवतमाळ) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत फरार चालकाचे नाव सारंग क्षिरसागर (वय ३०, रा. घाटंजी) असल्याचे निष्पन्न झाले. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये 'रॉकेट संत्रा' देशी दारूचे ४९ बॉक्स, अंदाजे २ लाख २० हजार ५०० रुपये किमतीचा माल आढळून आला. तसेच दारू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली महेंद्रा एक्सयूव्ही जप्त करण्यात आली. वाहनासह एकूण ६ लाख ७० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. या प्रकरणी हिमांशु चिंतामन किनाके आणि सारंग क्षिरसागर यांच्याविरुद्ध यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार चालकाचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी आणि पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश सपकाळ यांच्या नेतृत्वातील डी.बी. पथकाने केली.

# खासगी वाहनांवरील 'पोलीस' पाट्यांना लगाम

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**यवतमाळ:** खासगी चारचाकी व दुचाकी वाहनांवर लाल रंगात 'पोलीस' अशी पाटी अथवा 'पोलीस' असे अक्षर लिहून वाहनांचा वापर करणाऱ्यांविरोधात राज्यभर कारवाई करण्याचे निर्देश अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) कार्यालयाने दिले आहेत. अशा पाट्यांचा गैरवापर करून अवैध वाहतूक, दहशत निर्माण करणे आणि तपासणीपासून बचाव करण्याच्या तक्रारींची दखल घेत हा निर्णय घेण्यात आला आहे. अर्जदार सखाराम कुलकर्णी यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांकडे केलेल्या तक्रारीनंतर हा विषय अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) कार्यालयाकडे आला. त्यानुसार राज्यातील सर्व पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि महामार्ग पोलीस अधीक्षकांना संबंधित तक्रारीवर योग्य ती कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अनेक पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या खासगी वाहनांवर 'पोलीस' अशी लाल पाटी लावली जाते. त्यामुळे तपासणी नाक्यांवर अशी वाहने न तपासता पुढे सोडली जातात. याचाच गैरफायदा घेत काही जण अशा वाहनांचा अवैध वस्तूंच्या वाहतुकीसाठी वापर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर खासगी वाहनांवर 'पोलीस' अशी पाटी अथवा लाल अक्षरात 'पोलीस' लिहिलेली वाहने आढळल्यास महाराष्ट्र मोटार वाहन




नियम, १९८९ मधील नियम १३३(६) तसेच मोटार वाहन कायदा, १९८८ मधील कलम १७७ अंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या आदेशामुळे खासगी वाहनांवर 'पोलीस' अशी ओळख दर्शविणाऱ्या पाट्यांच्या गैरवापराला आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे

# यवतमाळात दुषित पाण्याचा पुरवठा

## नगरसेवक विपुल खोब्रागडे आक्रमक;आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**यवतमाळ :** यवतमाळ शहरातील प्रभाग क्रमांक १४ (ब) मधील पाटीपुरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, कळंब चौक, आंबेडकर नगर व दलित सोसायटी परिसरात मागील दोन ते तीन दिवसांपासून गढूळ, अशुद्ध व दुर्गंधीयुक्त पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



या पार्श्वभूमीवर नगर परिषद सदस्य विपुल पद्माकर खोब्रागडे यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देत तातडीने शुद्ध पाणीपुरवठा करण्याची मागणी केली आहे. निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, दूषित पाण्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून, संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने पाणीपुरवठ्याची तपासणी करून शुद्ध पाण्याचा पुरवठा सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने या समस्येकडे तातडीने लक्ष न दिल्यास परिसरातील नागरिकांसह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही नगरसेवक विपुल खोब्रागडे यांनी दिला आहे.



# शिवसेना पदाधिकाऱ्या-चा आयफोन लंपास

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**आर्णीः** शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील भाजीपाला बाजारात शिवसेना उपशहरप्रमुख मनोज दामोदर चारोडे यांचा सुमारे ६२ हजार रुपये किमतीचा आयफोन १६ अज्ञात चोरट्याने खिस्यातून लंपास केल्याची घटना रविवारी (३ ऑगस्ट) सायंकाळी घडली. या घटनेमुळे शहरातील मध्यवर्ती बाजारपेठेतील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मनोज चारोडे हे भाजीपाला खरेदी करत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातील मोबाईल चोरून नेला. घटनेची माहिती मिळताच परिसरात शोधाशोध करण्यात आली; मात्र मोबाईलचा कोणताही मागोवा लागला नाही. याप्रकरणी आर्णी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू केली आहे. संशयिताचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# नवीन फार्मसी अभ्यासक्रमासाठी राज्यस्तरीय मार्गदर्शन

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**पुसदः** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) आधारित नवीन भेषजी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचालित सुधाकरराव नाईक इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे अखिल भारतीय औषधनिर्माणशास्त्र शिक्षक संघटना (APTI-महाराष्ट्र राज्य) यांच्या प्रायोजकत्वाखाली राज्यस्तरीय ओरिएंटेशन कार्यक्रम उत्साहात पार पडला. राज्यातील ३५ हून अधिक फार्मसी महाविद्यालयांतील १२० पेक्षा अधिक प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (PCI), नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून NEP-2020 अनुषंगाने नवीन भेषजी पदवी अभ्यासक्रम लागू केला आहे. या अभ्यासक्रमातील बदल, अध्यापन पद्धती, परिणामाधारित शिक्षण (Outcome Based Education), मूल्यमापन




प्रणाली तसेच उद्योगाभिमुख शिक्षण याविषयी शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारती विद्यापीठ पूना कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य प्रा. (डॉ.) आत्माराम पवार यांनी संकल्पनाधारित, कौशल्यकेंद्रित अध्यापन-अध्ययन पद्धतीवर मार्गदर्शन केले. एमआयटी-डब्ल्यूपीयू, पुणे येथील प्रा. (डॉ.) सतीश पोलशेट्टीवार यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा औषधनिर्माणशास्त्रातील वापर प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह स्पष्ट केला. तर शासकीय फार्मसी महाविद्यालय, अमरावतीच्या प्राचार्य प्रा. (डॉ.) नजमा इनामदार यांनी नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचा समग्र दृष्टिकोन मांडला. कार्यशाळेच्या समारोप सत्रात हैदराबाद येथील 3D FIGचे संचालक डॉ. प्रकाश कटकम यांनी त्रिमितीय मुद्रण (3D प्रिंटिंग) तंत्रज्ञानावरील व्याख्यान देत प्रात्यक्षिक सादर केले. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे प्राचार्य डॉ. पी. एस. कवटीकवार व डॉ. आर. एस. वानरे यांच्या मार्गदर्शनाखाली IQAC विभागाच्या सहकार्याने करण्यात आले. जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जयभाऊ नाईक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व IQAC विभागाच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. गौरव बोथरा यांनी सर्व समित्यांमध्ये समन्वय साधत आयोजनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

# फुलसावंगीत ५५ वृक्षांची लागवड; पर्यावरण संवर्धनाचा संदेश

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**qQYLKOAXH:** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या 'एक पेड माँ के नाम 3.0' अभियानाअंतर्गत येथील जे. एस. पी. एम. उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्समध्ये वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सहभागातून एकूण ५५ वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपणाने झाली. मुख्याध्यापक मोहम्मद मुसद्दीक यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व पटवून देत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले.




वृक्ष हे मानवी जीवनाचे आधार असून पर्यावरण संतुलनासाठी त्यांचे संवर्धन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

शाळेचा परिसर अधिक हिरवागार आणि पर्यावरणपूरक करण्याच्या उद्देशाने विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

या उपक्रमात शिक्षक सय्यद वसीम रिझवी, सय्यद मुजाहिद, शाहिद खान, शबिना बानो, सुमय्या अंजुम, फातेमा शेख तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी इरफान देशमुख, शेख जावेद, रफीक गौरी, रफीक नवाब आणि शेख मुजफ्फर यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी लावलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन करण्याचा संकल्प करत पर्यावरण संरक्षणासाठी सातत्याने योगदान देण्याची प्रतिज्ञा केली. विद्यालयाच्या या उपक्रमाचे परिसरात स्वागत होत आहे.

# BHMS-CCMP डॉक्टरांच्या MMC नोंदणीविरोधात IMA आक्रमक

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**उमरखेड :** BHMS-CCMP डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (MMC)मध्ये नोंदणी करून आधुनिक वैद्यकीय व्यवसाय करण्यास परवानगी देण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA)ने आक्रमक भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र राज्य IMAने ४ व ५ ऑगस्ट रोजी पुकारलेल्या सेवा बंद आंदोलनाला IMA उमरखेड शाखेने जाहीर पाठिंबा देत उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

निवेदनात, NEETसारखी स्पर्धात्मक प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होऊन MBBS अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे वैद्यकीय शिक्षण दीर्घकालीन, कठोर आणि गुणवत्ताधारित असल्याचे नमूद




करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत आधुनिक वैद्यकीय शिक्षणाची पात्रता नसलेल्या अभ्यासक्रमधारकांना आधुनिक वैद्यकीय उपचार करण्याची परवानगी देणे हे वैद्यकीय शिक्षणाच्या गुणवत्तेशी तडजोड करणारे असून रुग्णांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर परिणाम करणारे ठरू शकते, असा दावा IMAने केला आहे. या निर्णयामुळे वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा घसरण्याबरोबरच MBBS डॉक्टरांच्या व्यावसायिक हक्कांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे संघटनेने म्हटले आहे. तसेच विविध वैद्यकीय अभ्यासक्रमांमधील व्यावसायिक सीमारेषा धूसर होऊन आरोग्य व्यवस्थेत संभ्रम निर्माण होऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली आहे. शासनाने संबंधित निर्णयाचा तातडीने पुनर्विचार करून तो मागे घ्यावा, वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता कायम राखावी तसेच रुग्णांची सुरक्षितता आणि MBBS डॉक्टरांच्या हक्कांचे संरक्षण करावे, अशी मागणी IMA उमरखेड शाखेने निवेदनातून केली आहे. दरम्यान, या निर्णयावरून राज्यातील वैद्यकीय क्षेत्रात पुन्हा एकदा वाद निर्माण झाला असून शासनाच्या पुढील भूमिकेकडे डॉक्टरांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



## विशेष सखोल पुनरीक्षणाला सहकार्य करावे; राजकीय पक्षांना आवाहन

**अमरावती :** जिल्ह्यात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. अद्यापपर्यंत 3 लाख 95 हजार मतदारांनी आवश्यक असलेला फॉर्म भरून दिलेला नाही. परीणामी मतदारयादीतून हे मतदार वगळले जाणार आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी मतदार शोधून त्यांच्याकडून फॉर्म जमा करण्यास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले. जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाबाबत राजकीय पक्षांची बैठक पार पडली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी जिल्ह्यातील विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. यावेळी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# अमरावतीच्या मुथुट गोल्ड लोन फायनान्स मध्ये अनियमितता!

## कोटींचे सोने आणि रकमेवर डल्ला : शेकडो ग्राहकांचा संताप, तक्रारींचा ओघ, अमरावतीच्या मुथुट गोल्ड लोन फायनान्स मध्ये अनियमित्ता - महत्त्वाचा अधिकारी फरार

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अमरावती :** अमरावतीतील विमाको टॉवर्स येथील मुथुट फिनकॉर्प फायनान्स कंपनीच्या शाखेतील शाखेतील एका अधिकाऱ्यावर कोट्यवधी रुपयांचे सोने आणि रोख रक्कम घेऊन फरार झाल्याचा गंभीर आरोप गुंतवणूकदारांनी केला आहे. या आरोपामुळे मंगळवारी दुपारपासून शाखेत मोठा गोंधळ उडाला असून, शेकडो ग्राहकांनी संताप व्यक्त केला.

मुथूट गोल्ड लोन फायनान्स मध्ये अनिमितता झाल्याचे आरोप ग्राहकांनी लावला आहे. मंगळवारी सुमारे 20 ते 25 हून अधिक ग्राहक गहाण ठेवलेले सोने सोडविण्यासाठी किंवा कर्जासंदर्भात चौकशी करण्यासाठी शाखेत पोहोचले होते. मात्र, येथील महत्त्वाचा अधिकारी फरार झाल्याचे तसेच अनेक ग्राहकांना देण्यात आलेल्या पावत्या बनावट असल्याची माहिती कर्मचाऱ्यांनी दिल्याचा दावा ग्राहकांनी केला.अनेकांनी आपली आयुष्यभराची कमाई किंवा हक्काचे सोने या कंपनीत गहाण ठेवून कर्ज घेतले होते. प्रत्यक्षात सोने सोडविण्यास गेलेल्या



### वैयक्तिक स्कॅनरचा वापर; पैसे केले वळते

तपासणीदरम्यान, व्यवस्थापक याने गोल्ड लोनच्या मोबदल्यात गुंतवणूकदारांनी भरलेले हप्ते स्वतःच्या वैयक्तिक स्कॅनरवर घेतल्याचे समोर आले. तसेच ग्राहकांच्या मोबाइलवर पैसे जमा झाल्याचे मेसेज येत असले, तरी ते पैसे कंपनीच्या खात्यात जमा न होता अन्यत्र कुठेतरी वळते झाल्याचे कर्मचाऱ्यांनी स्पष्ट केले.



मुथुट फायनान्सचे एरिया मॅनेजर आणि केरळ येथील मुख्य कार्यालयाच्या प्रतिनिधींशी संपर्क साधण्यात येत आहे. नेमकी किती कोटींची अफरातफर झाली, हे फायनान्सचे ऑडिट पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होईल.

**संजय खताळे,**
एसीपी, राजापेठ

### पोलिस ठाण्यात तक्रारी घेण्याचे काम सुरू

घटनेची माहिती मिळताच सिटी कोतवाली पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संतप्त नागरिकांना शांत करत पोलिस ठाण्यात बोलावले. आशिष क्षीरसागर, श्याम डेहनकर, मोहन निहाटकर यांच्यासह 25 ते 30 हून अधिक नागरिकांनी पोलिस ठाण्यात धाव घेत लेखी तक्रारी दिल्या आहेत. यामध्ये काहींचे १५ लाखांपर्यंतचे सोने अडकल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, उशिरा सायंकाळपर्यंत पोलिस ठाण्यात नागरिकांची प्रचंड गर्दी कायम होती.

## मालमत्ता कर वसुलीला अधिक गती द्या; उद्दिष्टपूर्तीसाठी प्रभावी नियोजन करा – आयुक्त



**अमरावती :** अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी आज मंगळवार (दि. ४ ऑगस्ट) महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत चालू आर्थिक वर्षातील मालमत्ता कर वसुलीची सद्यस्थिती, विभागनिहाय उद्दिष्टपूर्ती, प्रलंबित थकबाकी, मोठ्या करदात्यांकडील वसुली, कर संकलनातील अडचणी तसेच महसूल वाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली.

बैठकीत आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी मालमत्ता कर हा महापालिकेच्या महसुलाचा प्रमुख स्रोत असल्याचे सांगत, निर्धारित उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी नियोजनबद्ध आणि परिणामकारक पद्धतीने काम करण्याचे निर्देश दिले. प्रत्येक विभागाने दैनंदिन व साप्ताहिक वसुलीचे उद्दिष्ट निश्चित करून त्याचा नियमित आढावा घ्यावा, तसेच प्रत्येक अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रलंबित कर वसुलीकडे विशेष लक्ष द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

मोठ्या थकबाकीदारांकडून कर वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना देताना आयुक्तांनी संबंधितांना प्रत्यक्ष भेटी घेणे, नोटिसा बजावणे, नियमित पाठपुरावा करणे आणि आवश्यकतेनुसार महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींनुसार कारवाई करण्याचे निर्देश दिले. ज्या प्रकरणांमध्ये दीर्घकाळापासून थकबाकी आहे, त्यांची स्वतंत्र यादी तयार करून प्राधान्याने वसुली करावी, असेही त्यांनी सांगितले.

नागरिकांना कर भरणे अधिक सुलभ व्हावे यासाठी ऑनलाइन सुविधांचा अधिकाधिक प्रचार करावा, विविध माध्यमांतून जनजागृती करावी आणि करदात्यांच्या अडचणींचे तातडीने निराकरण करावे,असे निर्देशही त्यांनी दिले. कर भरण्यासाठी नागरिकांना सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशा प्रकारे संवाद वाढविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. बैठकीत विभागातील अधिकाऱ्यांनी विभागनिहाय कर वसुलीचा आढावा, प्रलंबित प्रकरणे, मागील वर्षाच्या तुलनेतील प्रगती, महसूल वाढीसाठी आखलेले नियोजन आणि येणाऱ्या अडचणी याबाबत सादरीकरण केले. विविध विभागांतील कामगिरीचा तुलनात्मक आढावा घेत आयुक्तांनी अपेक्षित प्रगती न झालेल्या क्षेत्रांमध्ये विशेष लक्ष देण्याच्या सूचना दिल्या.

तसेच, मालमत्ता कराच्या नोंदी अद्ययावत ठेवणे, नव्याने बांधलेल्या मालमत्तांचा कर आकारणी प्रक्रियेत समावेश करणे, मालमत्तांची माहिती डिजिटल स्वरूपात अद्ययावत करणे आणि महसूल वाढीसाठी उपलब्ध सर्व पर्यायांचा प्रभावी वापर करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. बैठकीच्या शेवटी आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करून मालमत्ता कर वसुलीचे निर्धारित उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. महसूल वाढल्यास शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर नागरी सेवांच्या विकासकामांना अधिक गती देता येईल, यासाठी मालमत्ता कर वसुली अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

या बैठकीत अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, मुख्यलेखाधिकारी शिल्पा पवार, सहाय्यक संचालक नगर रचना अधिकारी वैशाली गाठे, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, मनोज शहाळे, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी नर्मदा चव्हाण, प्रविण ठाकरे, अतिक्रमण पथक प्रमुख अजय बन्सेले, हरीष संतोसिया, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना युरोप, चीन दौऱ्याची संधी

## २० ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अमरावती :** कृषी विस्तार कार्यक्रमांतर्गत वर्ष २०२६-२७ साठी राज्यातील शेतकऱ्यांच्या विदेश अभ्यास दौऱ्यांचे आयोजन राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. इच्छुक व पात्र शेतकऱ्यांनी या परदेश अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्यासाठी २० ऑगस्टपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

योजनेंतर्गत जिल्ह्यातील प्रगतशील शेतकऱ्यांना युरोप आणि चीन या देशांतील शेतीविषयक प्रगत तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. जागतिक पातळीवर शेती क्षेत्रात होत असलेले बदल आणि नव्याने विकसित होणारे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत वेळेवर पोहोचवणे, हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. या दौऱ्यात परदेशातील कृषी शास्त्रज्ञ व तेथील शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधणे, शेतीविषयक विविध संस्था आणि आधुनिक शेतांना प्रत्यक्ष भेटी देणे, परदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकरी आपल्या उत्पन्नात कशी वाढ करू शकतात, याचे प्रात्यक्षिक व ज्ञान मिळवणे या बाबींचा समावेश राहणार आहे.

परदेश अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्यासाठी लाभार्थी स्वतः शेतकरी असावा. ॲग्रीस्टॅक शेतकऱ्याकडे 'फार्मर आयडी' असणे आवश्यक आहे. शेती हेच उत्पन्नाचे मुख्य साधन असावे, याबाबतचे स्वयंघोषणापत्र जोडणे आवश्यक आहे. एका शेतकरी कुटुंबामधून केवळ एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. सहलीच्या दिवशी शेतकऱ्याचे वय किमान २५ वर्षे पूर्ण असावे आणि शेतकऱ्याकडे वैध पासपोर्ट असणे आवश्यक आहे. शेतकरी कोणत्याही शासकीय, निमशासकीय, सहकारी अथवा खाजगी संस्थेत नोकरीला नसावा. अर्जासोबत ओळखपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.

याबाबत अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

## मनपा आयुक्तांच्या नावे संशयास्पद कॉल वा मेसेज; सायबर पोलिसांकडे करा तक्रार

### डॉ. गोंदावले यांचे आवाहन; ६६६२४२७८१०० या क्रमांकावरून पैशांची मागणी

**अमरावती :** महानगरपालिका वर्तुळातून एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, थेट मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या नावाचा गैरवापर करून ऑनलाइन आर्थिक फसवणुकीचा प्रयत्न केला जात आहे. अज्ञात सायबर भामट्यांकडून नागरिकांना व्हॉट्सॲपवर मेसेज पाठवून पैशांची मागणी केली जात आहे. या प्रकारामुळे पालिका प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.

सायबर गुन्हेगारांनी ६६६२४२७८१०० या आंतरराष्ट्रीय (थायलंड कोड) व्हॉट्सॲप क्रमांकावरून मनपा आयुक्तांच्या नावे महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील प्रतिष्ठित नागरिकांना संदेश पाठवून वेगवेगळ्या कारणांसाठी तातडीने पैशांची किंवा आर्थिक मदतीची मागणी केली. हा प्रकार वेळीच निदर्शनास आला.

### थेट सायबर सेलकडे तक्रार करा : डॉ. मंगेश गोंदावले

या गंभीर प्रकरणाची दखल घेत अमरावती मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी नागरिकांना अधिक सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. जर कोणालाही ६६६२४२७८१०० किंवा अशाच प्रकारच्या इतर कोणत्याही संशयास्पद क्रमांकावरून माझ्या नावाने मेसेज किंवा कॉल आल्यास, त्यावर अजिबात विश्वास ठेवू नका. कोणत्याही परिस्थितीत कुणालाही ऑनलाइन पैसे पाठवू नका. अशा संशयास्पद संदेशांची शहानिशा करा आणि तत्काळ जवळच्या पोलिस ठाण्यात किंवा सायबर गुन्हे शाखेकडे तक्रार नोंदवा, असे आवाहन आयुक्त डॉ. गोंदावले यांनी केले आहे. डॉ. मंगेश गोंदावले, आयुक्त, मनपा यांनी सांगितलं.

**मनपा प्रशासनाचा तत्काळ खुलासा :** हा प्रकार उघडकीस येताच अमरावती महानगरपालिका प्रशासनाने तत्काळ सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. मनपा आयुक्तांच्या वतीने किंवा त्यांच्या नावाने कोणत्याही व्यक्तीकडे व्हॉट्सॲप अथवा इतर कोणत्याही सोशल मीडिया माध्यमातून पैशांची किंवा कोणत्याही आर्थिक मदतीची मागणी केली जात नाही, असा स्पष्ट खुलासा प्रशासनाने केला आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा खोट्या मेसेजेसला बळी पडू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

सहायक आयुक्त विवेक देशमुख यांना विदेशातून पैशासाठी कॉल आला होता. यासंदर्भात शहानिशा केली, तेव्हा तो फ्रॉड कॉल होता. यासंदर्भात सायबर पोलिसांकडे तक्रार नोंदविली.

## 'जागतिक स्तनपान सप्ताहा'निमित्ताने जिल्ह्यात विविध उपक्रमांचे आयोजन

**अमरावती :** राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग आणि जिल्हा महिला व बाल कल्याण विभागाच्यावतीने १ ते ७ ऑगस्ट २०२६ दरम्यान विविध उपक्रमांद्वारे जिल्ह्यात 'जागतिक स्तनपान सप्ताह' साजरा करण्यात येत आहे.

आईच्या दुधातूनच जन्मानंतर पहिल्या एका तासात बालकास स्तनपान सुरु करणे तसेच जन्मापासून पहिल्या महिन्यापर्यंत केवळ आईचे दूध देणे बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असते. आईच्या दुधामुळे बालकाची रोगप्रतिकार शक्ती वाढते, आजारांपासून संरक्षण होते , मानसिक व बौद्धिक विकासाला चालना मिळते. 'शाश्वत जीवनाच्या सुरुवातीसाठी स्तनपान : जे प्रभावी आहे ते अधिक बळकट करा' ही यावर्षी जागतिक स्तनपान सप्ताहाची संकल्पना आहे. यानुसार स्तनपानाच्या माध्यमातून नवजात बालकास आयुष्याची सर्वोत्तम सुरुवात मिळावी तसेच ९ ते ५९ महिन्यापर्यंतच्या बालकांना 'अ' जीवनसत्व पुरक आहार देण्याबाबतही जिल्ह्यात आयोजित होणाऱ्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे.

**जिल्ह्यात विविध उपक्रम**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण परिसे यांच्या मार्गदर्शन आणि जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. पराग राठोड यांच्या नियोजनात जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्ताने जिल्हा रुग्णालय,उपजिल्हा रुग्णालये,प्राथमिक आरोग्य केंद्र ,आयुष्यमान आरोग्य मंदिरे तसेच गाव पातळीवर आरोग्य कर्मचाऱ्यांचे पुनश्चर्या प्रशिक्षण,गर्भवती व स्तनदा मातांसाठी समुपदेशन विषयक कार्यशाळा, माता-पालक बैठका, शालेय स्तरावरील प्रश्नमंजुषा,निबंध व चित्रकला स्पर्धा तसेच स्नपानास पोषक वातावरण निर्मितीस पोषक विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## 10 ऑगस्ट रोजी 'प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा'

**अमरावती :** संत गाडगेबाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या (आयटीआय) एनएसएस हॉलमध्ये येत्या १० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता जिल्ह्यातील सर्व आयटीआयच्या विद्यार्थ्यांकरिता 'प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व आयटीआय मध्ये फिटर,टर्नर,इलेक्ट्रेशियन,मॅकनिस्ट,टूल डाय मेकर, मशीन मोटर व्हेईकल, डिझेल मशीन, इलेक्ट्रेशियन, वेल्डर (गॅस/इलेक्ट्रीक),ड्रेस-मेकिंग, सुईंग –टेक्नॉलॉजी,फॅशन टेक्नॉलॉजी या विषयांत उत्तीर्ण व अंतिम वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या तसेच पदवी व पदविका धारक (मेकॅनिकल) उमेदवारांसाठी या राष्ट्रीय भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. नामांकित कंपन्यांमार्फत शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.उमेदवारांनी या भरती मेळाव्यासाठी येताना सोबत बायोडेटा आणि आवश्यक कागदपत्रांच्या छायापत्री आणणे आवश्यक आहे. सर्व इच्छूक उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपसंचालक तसेच सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र , संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था अमरावती यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांसह गढूळ पाण्यात बसून अनोखे आंदोलन

## साईनगरमधील आंदोलनाने प्रशासन हादरले; राष्ट्रवादीचे पदाधिकाऱ्याचा पुढाकार

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**दर्यापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) चे जिल्हा उपाध्यक्ष शुभम होले यांनी आज आपल्या वाढदिवसाच्या दिवशी एक अनोखे आंदोलन सुरू करत दर्यापूर शहरातील साईनगर भागातील जिल्हा परिषद शाळेच्या आवारात साचलेल्या गढूळ पाण्यातच उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला आहे.

माहितीनुसार, या परिसरात गेल्या २० ते २५ वर्षांपासून गढूळ व साचलेल्या पाण्याची समस्या कायम असून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. या गंभीर समस्येकडे वारंवार लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याचा आरोप शुभम होले यांनी केला आहे. सध्या सुरू असलेल्या या आंदोलनाला एक तासाहून अधिक काळ उलटून गेला असतानाही प्रशासनाचा एकही वरिष्ठ



अधिकारी घटनास्थळी दाखल झालेला नाही, अशी माहिती आंदोलनकर्त्यांकडून देण्यात आली आहे. आंदोलनस्थळी साचलेल्या पाण्यात मोठे साप, इंचू तसेच इतर धोकादायक प्राणी आढळून आल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, याच जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात चार अंगणवाड्या कार्यरत असून त्यामध्ये लहान चिमुकले विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अशा परिस्थितीतही प्रशासनाने या समस्येकडे दुर्लक्ष केल्याने संताप व्यक्त होत आहे.

'विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या या परिस्थितीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष असह्य झाले आहे. त्यामुळेच आम्हाला गढूळ पाण्यात उतरून आंदोलन करावे लागत आहे,' असे शुभम होले यांनी सांगितले.

या अनोख्या आंदोलनामुळे साईनगर परिसरात मोठी गर्दी जमा झाली असून नागरिकांकडूनही प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. आता प्रशासन या आंदोलनाची दखल घेऊन तातडीने उपाययोजना करते का, याकडे संपूर्ण दर्यापूरचे लक्ष लागले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






## राजस्थान शिक्षण मंडळाकडून...

# तिहेरी लूट, अर्थपुर्ण सूट !

## * अधिकाऱ्याकडून गरीब - श्रीमंत फूट

* शासकीय जागेवर अतिक्रमण केले
* वस्तीगृहाच्या नावावर अनुदान लाटले
* शासनाची जागा शासनालाच भाड्याने

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

येथील राजस्थान महाविद्यालयाने शासकीय जागेवर अतिक्रमण करून युजीसीच्या कोट्यवधीच्या अनुदानातून मुलींच्या वसतीगृहाची मोठ्ठी ईमारत बेकायदेशीर बांधली. शासनाच्या जागेवर अतिक्रमण करून बांधलेली वसतीगृहाची ईमारत चक्क वाशीमच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला मुलींच्या वसतीगृहासाठी नियमबाह्य भाड्याने देवून भ्रष्टाचाराचा कळस गाठला आहे.ही जागा शासनाच्या मालकीची असून राजस्थान कॉलेजच्या प्राचार्यासह संस्थाध्यक्षांनी कागदपत्रात हेराफेरी करून कोट्यवधीचा मलीदा लाटला आहे. तर दुसरीकडे शासन गरीबाच्या अतिक्रमणाची तक्रारीची दखल घेवून गरीबांचे अतिक्रमण काढते. तर तिसरीकडे १३ वर्षापासून तक्रारी करूनही श्रीमंताचे अतिक्रमण काढत नसल्याने अधिकाऱ्याकडून अर्थपूर्ण गरीब - श्रीमंत अशी फूट पाडल्या जात आहे. त्यामुळे नियम व कायद्या वापरून शासनाची जमीन शासनाला परत करून शासनाचा फायदा करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांनी केली आहे.

येथील राजस्थान शिक्षण मंडळामार्फत सुरू असलेल्या राजस्थान महाविद्यालयाने जवाहर नवोदय विद्यालयाला लागूनच



असलेल्या शासकीय जागेवर अनेक वर्षापासून अतिक्रमण केलेले आहे.या शासकीय जागेवर राजस्थान महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतीगृहासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या कोट्यवधीच्या अनुदानातून बेकायदेशीररित्या शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवून मुलींच्या वसतीगृहाची टोलेजंग ईमारत बांधली.हा गैरप्रकार सर्वप्रथम सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे पाटील यांच्या निदर्शनास आली.देवढे पाटील यांनी या प्रकरणाची तक्रार येथील जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.त्यानंतर त्यांनी मंत्रालयापर्यंत पाठपुरावा सुद्धा केला.या प्रकरणाबाबत दिवंगत आमदार विनायकराव मेटे यांनी विधानसभेत लक्षवेधी प्रश्न उपस्थित करून 'या' अतिक्रमणाकडे शासनाचे लक्ष वेधले होते.तरीही वाशीमच्या महसूल प्रशासनाने 'या' अतिक्रमणाला 'राजाश्रय' देवून आजपर्यंत ते अतिक्रमण काढण्यासाठी आणि ती कोट्यवधीची जागा शासनाच्या ताब्यात घेण्यासाठी पुढाकारच घेतला नसल्याचा आरोप सुभाष देवढे यांनी केला आहे.राज्याचे विद्यमान कर्तव्यदक्ष महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदर्शनास 'ही' गंभीरबाब आणून देवून महसूल प्रशासनाचा नाकर्तेपणाही उघडकीस आणून दिला आहे.देवढे पाटील यांचा या प्रकरणात शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.आता 'हे' अतिक्रमण महसूल प्रशासन काढण्यासाठी केव्हा मुहूर्त काढणार याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

### महसुलमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र भ्रष्ट कर्मचाऱ्यांचे टाळाटाळीचे सत्र...

१३ वर्षापासून राजस्थान आर्य शिक्षण संस्थेने अनाधिकृत ताब्यात घेतलेली महसुल प्रशासनाची जागा ताब्यात घ्यावी असे पत्र तत्कालीन महसुल मंत्री व जिल्हाधिकारी व आताचे महसुल मंत्री व जिल्हाधिकारी यांनी प्रशासनाला दिले आहे. मात्र प्रशासनात असलेल्या भ्रष्ट अवगुण असलेल्या धुर्त कर्मचाऱ्याने आर्थिक देवाण घेवाण करून टाळाटाळीचे सत्र सुरू ठेवले आहे. महसुल मंत्र्याच्या व जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्राला लालफितीत ठेवणाऱ्या भ्रष्टअधिकाऱ्यावर कारवाई करून जागा ताब्यात घ्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे यांनी केली आहे.

## थोडक्यात

### विधी स्वयंसेवकांना पीसीपीएनडीटी कायद्याचे सखोल प्रशिक्षण



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम यांच्या वतीने विधी स्वयंसेवकांसाठी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान (पीसीपीएनडीटी) (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम, १९९४ या विषयावरील प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दि. ३ ऑगस्ट रोजी विधी सेवा सदन, वाशिम येथे करण्यात आले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. जी. चौखंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या प्रशिक्षण शिबिरात विधी स्वयंसेवकांना पीसीपीएनडीटी कायद्याच्या तरतुदी, त्याची प्रभावी अंमलबजावणी आणि समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्यातील त्यांची भूमिका याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

प्रास्ताविकात सचिव व्ही. जी. चौखंडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यालयातील कर्मचारी ऐश्वर्या कैलास डाखोरे यांनी केले, तर प्रसाद शिवाजी भोसले यांनी आभार मानले. प्रशिक्षण शिबिरास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विधी स्वयंसेवक उपस्थित होते.

## लेमन सोड्यावर नाही उत्पादन तिथी, मग एक्सपायरी कधी...

# कारवाईच्या आधी, भ्रष्टधिकाऱ्यांना मिळाला निधी !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील शेलुबाजार येथे उत्पादीत होणारा कथित लेमन सोडा प्रकरण आता 'शाही' थाटात गाजत आहे. कारण या उत्पादन कंपनीचा मालक कुणीतरी 'शहा' असल्याने अन्न व औषध प्रशासन विभाग झोपेचे सोंग घेऊन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. परिणामी बाजारात विकल्या जात असलेल्या बाटलीवर उत्पादन तारीखच नाही, तर एक्सपायरी कधी ? हा कळीचा मुद्दा उपस्थित होत आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे.तरीही नियमाला हरताळ फासणाऱ्या कंपनीवर कारवाईसाठी टाळाटाळ केल्या जात आहे.राज्यात इतरत्र कारवाया होत असतांना शेलुबाजारच्या लेमन सोड्यावर अर्थपूर्ण दुर्लक्ष केल्या जात आहे.

## *नियमाला हरताळ, कारवाईसाठी अर्थपूर्ण टाळाटाळ









शेलुबाजार येथील STRESSCURE सॉफ्ट ड्रिंक्स अँड मिनरल वॉटर प्रा.ली. कंपनीच्या लेमन सोडा बाटलीवर उत्पादन तारीख, बॅच नंबर आणि किरकोळ विक्री किंमत नसल्याचे उघड झाले आहे. सदर लेमन सोड्याच्या बाटलीवर ' एँध्ऊऊर्ऐ ऐंख/ ऐंइ असा उल्लेख आहे, मात्र त्या ठिकाणीही कोणतीही माहिती छापलेली नाही.' Best Before 3 Months from the date of mfg ' असं लिहिलं असलं तरी उत्पादन तारीखच नसल्याने एक्सपायरी कधी हे ग्राहकांना कळणार कसं ? हा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. या बाबत सिटीन्यूज सुपरफास्टने सातत्याने पाठपुरावा केला आहे. मात्र अन्न व औषध प्रशासन विभाग वाशिम या गंभीर प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सर्व सामान्य नागरिक करत असून कुठतरी पाणी मुरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यानिमित्ताने अन्न सुरक्षा नियमांनुसार उत्पादन तारीख, बॅच नंबर बंधनकारक असताना अन्न व औषध प्रशासन विभाग वाशिम का गप्प आहे. हा कळीचा मुद्दा उपस्थित होत आहे. मात्र माफीयांना कारवाईची धास्ती नसल्याने अधिकाऱ्यांनी त्यांची मस्ती उतरविण्याची गरज आहे.




# पोल गंजला, धोका वाढला; महावितरणचा कारभार झोपला!

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

रिसोड तालुक्यातील केनवड येथील प्रभाग क्रमांक ३ मध्ये लादे यांच्या घराजवळील महावितरणचा विद्युत पोल तळापासून गंजून जीर्ण झाला असून नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहे. पोलच्या पायथ्यालगत सांडपाणी वाहत असल्याने परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे. काही दिवसांपूर्वीच गावात विजेच्या धक्क्याने एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झालेला असताना महावितरणने त्यातूनही धडा घेतलेला नाही का? आणखी एखाद्या दुर्घटनेची प्रतीक्षा आहे का? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.





## भरवस्तीत जीर्ण विद्युत पोलमुळे नागरिकांचा जीव धोक्यात; दुर्घटनेनंतरच महावितरण जागे होणार का?

पोलच्या खालच्या भागाला मोठ्या प्रमाणात गंज लागून झीज झाली आहे. भरवस्तीतील या मार्गावर नागरिकांसह लहान मुलांची सतत ये-जा असते. पावसाळ्यात जोरदार वारा किंवा मुसळधार पावसात दुर्घटना घडण्याची भीती नागरिक व्यक्त करीत आहेत.विशेष म्हणजे, २३ जून रोजी केनवडमध्ये घरावरील झेंडा सरळ करताना लोखंडी पाईपचा ११ केव्ही उच्चदाब वीजवाहिनीशी संपर्क झाल्याने संकेत संतोष खराटे (वय २०) याचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्याला वाचविण्यासाठी धावलेल्या आईलाही विजेचा तीव्र धक्का बसून गंभीर दुखापत झाली होती. या घटनेने संपूर्ण गाव हादरले होते.

त्या दुर्घटनेचे अश्रू अजून सुकलेले नसतानाच भरवस्तीत गंजलेला पोल उभा असल्याने महावितरणच्या देखभाल व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वीज बिलाच्या थकबाकीसाठी तत्परता दाखविणारे महावितरण नागरिकांच्या सुरक्षेसाठीही तितकीच तत्परता दाखविणार का, असा सवाल ग्रामस्थ करीत आहेत.संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने पोलची तांत्रिक तपासणी करून तो असुरक्षित असल्यास नवीन पोल बसवावा. तसेच गावातील जीर्ण व धोकादायक पोलचे सर्वेक्षण करून संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

### दुर्घटनेनंतर पंचनामा नको; दुर्घटनेपूर्वी उपाय हवा!

दुर्घटना घडल्यानंतर पंचनामा आणि नुकसानाची नोंद करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी वेळीच उपाय करणे महत्त्वाचे आहे. धोका डोळ्यांसमोर असताना जीव गेल्यानंतर कागदी सोपस्कार करण्यापेक्षा आधीच पावले उचलावीत, अशी नागरिकांची मागणी आहे. कारण




पंचनाम्याने गेलेला जीव परत येत नाही; मात्र वेळीच केलेली उपाययोजना एखादा जीव वाचवू शकते!

### संकेत गेला... तरी धोक्याचा 'संकेत' महावितरणला कळेना!

केनवडमध्ये २३ जून रोजी विजेच्या तडाख्याने अवघ्या २० वर्षांच्या संकेत संतोष खराटेचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्या आईच्या डोळ्यांतील अश्रू अजून सुकले नाहीत, गावही त्या धक्क्यातून सावरलेले नाही. अशातच भरवस्तीत गंजलेला विद्युत पोल पुन्हा संभाव्य अनर्थाचा 'संकेत' देत आहे.एका तरुणाचा जीव गेल्यानंतरही हा धोक्याचा 'संकेत' समजणार नसेल, तर आणखी एखाद्या दुर्घटनेनंतरच महावितरण जागे होणार का? असा संतप्त सवाल केनवडकर उपस्थित करीत आहेत.

# वाशीममध्ये 'तंबाखूमुक्त शाळा' कार्यशाळा !

### तरुण पिढीला व्यसनापासून वाचवण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम - येथील जिल्हा परिषद वसंतराव नाईक सभागृहात ३ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद शिक्षण विभाग व 'सलाम मुंबई फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने 'तंबाखूमुक्त शाळा' या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील (आयपीएस) उपस्थित होते.

या कार्यक्रमास जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेंद्र महाजन, प्राथमिक शिक्षणाधिकारी भुसारे, उपशिक्षणाधिकारी डाबेराव आणि सलाम मुंबई फाउंडेशनच्या जिल्हा समन्वयक सारिका कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच जिल्हा तंबाखू नियंत्रण व आरोग्य विभागाचे समुपदेशक सरकटे व धाडवे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्ह्यातील एकूण १०९ अधिकारी व शिक्षकांनी या प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष लाभ घेतला.आपल्या मार्गदर्शनात बोलताना जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांनी तंबाखू आणि इतर व्यसनांचे समाजावर होणारे घातक दुष्परिणाम स्पष्ट केले. शाळांच्या परिसरात व्यसनमुक्तीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित कायदे, सुव्यवस्था आणि प्रशासकीय नियमांची सविस्तर माहिती त्यांनी दिली. तरुण पिढीला व्यसनाधीनतेच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शाळांचा परिसर व्यसनमुक्त ठेवण्यासाठी शिक्षकांनी वेळीच योग्य पावले उचलावीत, असे ते म्हणाले.व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी उपाययोजनांवर चर्चा कार्यक्रमात प्राचार्य डॉ. राजेंद्र महाजन व शिक्षणाधिकारी भुसारे यांनीही उपस्थितांना संबोधित केले. दिवसेंदिवस वाढणाऱ्या व्यसनाधीनतेच्या प्रमाणावर वेळीच आळा घालण्यासाठी शाळा स्तरावर कोणत्या उपाययोजना राबवता येतील, यावर सविस्तर चर्चा झाली. सलाम मुंबई फाउंडेशनच्या जिल्हा समन्वयक सारिका कदम यांनी 'तंबाखूमुक्त शाळा' या संकल्पनेअंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या नवीन निकषांची सविस्तर माहिती दिली. या प्रसंगी तंबाखूमुक्त शाळेचे मास्टर ट्रेनर अमोल काळे यांनी शंकांचे निरसन आणि 'तंबाखूमुक्त भारता'चा संकल्प या विषयावर मत व्यक्त केले. सत्राच्या शेवटी प्रशिक्षणार्थी शिक्षक व अधिकाऱ्यांच्या विविध शंकांचे मार्गदर्शकांनी समाधानकारक निरसन केले. शेवटी, कार्यशाळेतील सर्व उपस्थित अधिकारी आणि शिक्षकांनी 'तंबाखूमुक्त भारत' घडवण्याचा दृढ संकल्प केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com




# नाल्यातील गाळ टाकल्याने रुग्णालयासमोर घाणीचे साम्राज्य

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**खामगाव :** सामान्य रुग्णालय परिसरात मंगळवारी नाल्यातून काढलेला गाळ आणि मलबा मुख्य शेगाव-खामगाव मार्गालगत टाकल्याने परिसरात गंभीर अस्वच्छता आणि दुर्गंधी निर्माण झाली आहे, ज्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हा अहवाल दिला जात आहे.



काही दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर मोठ्या प्रमाणात पाणी साचून डबक्याचे पावसामुळे सामान्य स्वरूप निर्माण झाले होते. या समस्येबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्यानंतर संबंधित यंत्रणेकडून नाल्याची सफाई करण्यात आली. मात्र, सफाईदरम्यान काढण्यात आलेला गाळ व मलबा रस्त्यालगतच टाकण्यात आल्याने त्यातील दूषित पाणी पुन्हा रस्त्यावर पसरले असून, रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोर साचले आहे.

या दूषित पाण्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून, रुग्ण, त्यांच्या नातेवाइकांसह नागरिकांना श्वास घेण्यासही त्रास होत असल्याची तक्रार आहे. विशेष म्हणजे, याच परिसरात नाश्त्याचे स्टॉल असल्याने दूषित पाण्यातून निर्माण होणारे जीवजंतू व माशा खाद्यपदार्थांवर बसण्याची शक्यता आहे.

# मलकापुर शहरात पाणीपुरवठा वाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया

## नगरपालिका विभागाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांत संताप!



प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**मलकापुर:** शहरात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झालेली असतानाच दुसरीकडे प्रशासकीय दुर्लक्षामुळे लाखो लिटर शुद्ध पाणी रस्त्यावरून वाहून गेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. शहीद अब्दुल हमीद चौक परिसरात नगरपालिका पाणीपुरवठा विभागाच्या मुख्य पाणी सोडण्याच्या जागेवरील पाईप फुटल्याने हजारो-लाखो लिटर पिण्याचे पाणी वाया गेले. शहीद अब्दुल हमीद चौक हा अत्यंत गजबजलेला भाग असून याच ठिकाणी अधिकृत-अनधिकृत ऑटो स्टॉप आहे. दिवसभर असंख्य ऑटो आणि जड वाहनांची या मार्गावरून सतत ये-जा सुरू असते. वाहनांच्या याच प्रचंड भारामुळे आणि सततच्या वर्दळीमुळे रस्त्याखालील ही पाईपलाईन फुटली असावी, असा अंदाज स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. पाणीपुरवठा सुरू होताच चौकात पाण्याचे मोठे कारंजे उडाले आणि काही वेळातच संपूर्ण परिसर पाण्याखाली गेला. पाणीपुरवठा विभागाचे या महत्त्वाच्या ठिकाणाकडे असलेले दुर्लक्ष आणि योग्य देखभालीचा अभाव यामुळेच ही दुर्घटना घडल्याचा आरोप नागरिक करत आहेत. एकीकडे लोकांना पाण्यासाठी ताटकळावे लागत असताना अशा प्रकारे पालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे पाणी वाया जात असल्याने मलकापुरकरांमधून तीव्र रोष व्यक्त होत आहे. प्रशासनाने तात्काळ या फुटलेल्या पाईपची दुरुस्ती करावी आणि भविष्यात असा प्रकार टाळण्यासाठी चौकातील ऑटो स्टॉपचे नियोजन करून पाईपलाईनला योग्य संरक्षण द्यावे, अशी जोरदार मागणी आता स्थानिक रहिवाशांकडून केली जात आहे.

# गढूळ पाण्यामुळे खामगाव शहराचा जलपुरवठा विस्कळीत!

## आरोग्याच्या दृष्टीने नगरपालिकेची खबरदारी!

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**खामगाव :** मुसळधार पावसामुळे धरणातील पाणी गढूळ झाल्याने शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने नगरपालिकेने प्रभावित भागांतील पाणीपुरवठा तात्पुरता बंद केला आहे. जलशुद्धीकरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरातील घाटपुरी नाका, सिव्हिल लाईन तसेच इतर अनेक भागांत नळातून गढूळ पाणी येत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात नगरपालिकेकडे प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून संबंधित भागांतील पाणीपुरवठा तात्पुरता बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जलशुद्धीकरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच पाणीपुरवठा पुन्हा सुरू केला जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार, धरणातील पाण्यात गाळाचे प्रमाण वाढल्याने जलशुद्धीकरण प्रक्रियेला अधिक वेळ लागत आहे. त्यामुळे येत्या दोन ते तीन दिवस शहरातील काही भागांतील पाणीपुरवठा विस्कळीत राहण्याची शक्यता आहे. नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा तसेच आवश्यकतेनुसार पिण्याचे पाणी साठवून ठेवावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. दरम्यान, शहरातील पाणीपुरवठा अधिक सुरळीत करण्यासाठी विविध ठिकाणी जलवाहिन्यांवरील गळती दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर सुरू असल्याची माहितीही प्रशासनाने दिली.

# कपाशीचा निर्णायक टप्पा; 35 ते 75 दिवसांत व्यवस्थापन अत्यावश्यक!

## योग्य नियोजनाने बोंडधारणा आणि उत्पादनात वाढ शक्य!

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**खामगाव :** खरीप हंगामात कापूस पिकाच्या लागवडीनंतरचा ३५ ते ७५ दिवसांचा कालावधी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या टप्प्यातील योग्य नियोजन व व्यवस्थापनाचा पिकाच्या वाढीवर, पाते-फुलांच्या निर्मितीवर आणि बोंडधारणेवर थेट परिणाम होतो. सध्या अनेक भागांत कापूस ४० ते ६० दिवसांच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी वाढ समाधानकारक असली, तरी काही भागांत वाढ मंदावलेली दिसून येते. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतातील परिस्थितीनुसार शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

### वाढ नियंत्रणासाठी शेंडा खुडणे, वाढरोधकांचा वापर!

» पिकाची संतुलित वाढ राखण्यासाठी शेंडा खुडणे, अनावश्यक फांद्या काढणे आणि वाढ नियंत्रकांचा योग्य वापर महत्त्वाचा ठरतो. यामुळे झाडांची उंची नियंत्रित राहून पोषणद्रव्यांचा योग्य वापर होतो. मेपिक्वाट क्लोराइड किंवा पॅक्लोब्युट्राझोल यांसारख्या वाढरोधकांचा योग्य टप्प्यावर वापर केल्यास बोंडधारणा सुधारते.

दुसऱ्या महिन्यात खत व अन्नद्रव्य व्यवस्थापन विशेष महत्त्वाचे ठरते. पहिल्या खताच्या मात्रेनंतर सुमारे २५ दिवसांनी दुसरी मात्रा देणे उपयुक्त ठरते. मात्र, हा डोस देताना जमिनीतील ओलावा, सुपीकता आणि पिकाची अवस्था लक्षात घेणे आवश्यक आहे. गरजेनुसार संतुलित खतांचा वापर करावा. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भासल्यास विद्राव्य खतांचा वापर फायदेशीर ठरतो. कोणतीही खते एकत्र मिसळून देणे टाळावे. नियमित निरीक्षण, शास्त्रीय नियोजन आणि योग्य व्यवस्थापन केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ साधता येते, असे कृषी तज्ज्ञांचे मत आहे.

# धानोरा येथील 19 वर्षीय तरुणी बेपत्ता ; तक्रार दाखल

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**मलकापूर :** नांदुरा तालुक्यातील धानोरा येथील १९ वर्षीय तरुणी घरातून कोणालाही न सांगता निघून गेल्याची घटना समोर आली असून, याप्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात बेपत्ता नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुर्गा राजेंद्र धाडे (वय १९, शिक्षण – बी.ए. द्वितीय वर्ष, रा. धानोरा, ता. नांदुरा) ही ३ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास घरातून कोणालाही न सांगता निघून गेली. ती घरातून जाताना तिची आवश्यक कागदपत्रेही सोबत घेऊन गेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तरुणीची उंची सुमारे ५ फूट २ इंच असून रंग गोरा आहे. अंगात काळ्या रंगाची जीन्स पँट, पांढऱ्या रंगाचा टी-शर्ट, पायात पांढऱ्या रंगाचे बूट असून केस काळे व लांब आहेत. मुलीचा नातेवाईक तसेच गावात आणि परिसरात शोध घेऊनही ती आढळून न आल्याने तिचे वडील राजेंद्र रायभान धाडे (वय ५६, रा. धानोरा) यांनी मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून मिसिंग क्रमांक १६/२०२६ दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस अंमलदार पंकज वराडे करीत आहेत. दरम्यान, संबंधित तरुणीबाबत कोणालाही माहिती मिळाल्यास मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्याशी तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# शासकीय संपादित जमीन स्वत:च्या नावे करण्याची मागणी; अन्यथा 13 पासून आमरण उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**नांदुरा:** हिंगणे गव्हाड येथील शासकीय संपादित जमीन स्वतःच्या नावे करून देण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे धाव घेतली आहे. मागणी मान्य न झाल्यास १३ ऑगस्ट २०२६ पासून तहसील कार्यालय, नांदुरा येथे बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. कपिल प्रल्हाद इंगळे व हिंगणे गव्हाड येथील इतर नागरिकांनी उपविभागीय अधिकारी, नांदुरा तसेच तहसीलदार, नांदुरा यांना याबाबत ४ ऑगस्ट रोजी निवेदन दिले आहे. निवेदनात १९ मार्च १९७५ रोजीच्या भूसंपादन प्रकरणाचा संदर्भ देण्यात आला आहे. निवेदनात म्हटले आहे की, हिंगणे गव्हाड येथील गटातील एकूण १.४२ हेक्टर क्षेत्रापैकी ०.३२ हेक्टर जमीन भूमिहीन मजुरांचे झोपडपट्टीसाठी संपादित करण्यात आली होती. मात्र, संबंधित क्षेत्राची नोंद गावठाणाच्या अभिलेखात अद्याप योग्य पद्धतीने झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वीही तहसीलदार, उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे याबाबत मागणी करण्यात आली आहे. तसेच गावठाण हद्दीमध्ये १७ घरांचा समावेश करण्याच्या मागणीसह संबंधित आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने १२ ऑगस्ट २०२६ पर्यंत ७/१२ उतारा, नमुना ८ व मालमत्ता पत्रक आपल्या नावे करून देण्याबाबत निर्णय घ्यावा, अन्यथा १३ ऑगस्टपासून आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी शासन व प्रशासनाची राहील, असा इशाराही निवेदनकर्त्यांनी दिला आहे.

# मद्यप्राशन करून दुचाकी चालवणाऱ्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**मलकापूर :** शहरातील तुलसी ज्वेलर्ससमोर दारूच्या नशेत भरधाव व वाकडी-तिकडी दुचाकी चालवून स्वतःसह इतरांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या चालकाविरुद्ध मलकापूर शहर पोलिसांनी मोटार वाहन अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास तुलसी ज्वेलर्ससमोर पोलिस पथक गस्त घालत असताना मेश धोंडीराम तायडे (वय ४०, रा. वाकोडी, ता. मलकापूर) हा त्याच्या ताब्यातील हिरो होंडा फॅशन प्रो (क्र. एमएच-२८-झेड-८९४०) ही दुचाकी भरधाव व अनियंत्रितपणे चालविताना आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणी केली असता तो मद्यप्राशन केल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अभिप्रायातून निष्पन्न झाले.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल कैलास शिवाजी सोनुने यांच्या फिर्यादीवरून मलकापूर शहर पोलीस ठाण्यात मोटार वाहन अधिनियमाच्या कलम १८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक फौजदार शामनंद सिरसाट करीत आहेत.

# शेतकऱ्यांची अडवणूक खपवून घेणार नाही - दामू अण्णा इंगोले

## अमोल पाटील यांच्या अटकेच्या निषेधार्थ स्वाभिमानी आक्रमक; दत्तक गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेणार

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**खामगाव :** सेंट्रल बँक शाखा खामगाव कडून शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळविताना होत असल्याच्या कथित अडवणुकीसह बँक प्रशासनाची अरेरावी, कर्जमाफीतील तफावत आणि दलालांमार्फत होत असल्याच्या कथित शोषणाविरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. बुलढाणा जिल्हाध्यक्ष अमोल पाटील यांच्या अटकेच्या निषेधार्थ खामगाव ४ ऑगस्ट रोजी विश्रामगृहात संघटनेच्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली.

यावेळी युवा प्रदेशाध्यक्ष दामू अण्णा इंगोले, मराठवाडा अध्यक्ष किशोर ढगे, तालुकाध्यक्ष नागेश दुधाटे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांशी मुजोरी करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात आता कायदेशीर मार्गाने लढा उभारला जाईल, असा इशारा दामू अण्णा इंगोले यांनी दिला. दत्तक गावांमध्ये शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेणार सेंट्रल बँकेशी पीक कर्जासाठी जोडलेल्या प्रत्येक दत्तक गावात संघटनेचे पदाधिकारी जाऊन शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेणार आहेत. कर्जप्रकरणातील अडवणूक, कर्जमाफीच्या याद्यांमधील तफावत, खात्यातील रकमेच्या समस्या तसेच दलालांमार्फत शेतकऱ्यांचे कथित शोषण याबाबत तक्रारी संकलित केल्या जाणार आहेत. या तक्रारींचा अहवाल तयार करून जिल्हाधिकारी व लीड बँक प्रशासनाकडे सादर करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांशी कथित गैरवर्तन करणाऱ्या संबंधित बँक व्यवस्थापकाविरोधात चौकशी करून दोष आढळल्यास कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही संघटनेने केली. कर्जमाफी, 'राईट ऑफ'चा मुद्दा ऐरणीवर कर्जमाफीची प्रत्यक्ष रक्कम आणि कर्जखात्यातील थकबाकी यामध्ये तफावत असल्याच्या तक्रारी असून, 'राईट ऑफ' प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत असल्याचा दावा संघटनेने केला. सिबिल स्कोअरवर परिणाम होत असल्याच्या तक्रारींचीही दखल घेण्याची मागणी करण्यात आली. दरम्यान, ५ तारखेला होणाऱ्या न्यायालयीन सुनावणीनंतर आंदोलनाची पुढील दिशा निश्चित केली जाणार आहे. त्यानंतर आंदोलन उभारून मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास ते अधिक तीव्र करण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला. शेतकऱ्यांची अडवणूक आणि बँक अधिकाऱ्यांची अरेरावी आता सहन केली जाणार नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी कायदेशीर लढा शेवटपर्यंत सुरू राहील,ज्ञ् असा निर्धार संघटनेने व्यक्त केला.

# अहिल्या संदेश यात्रेचे मलकापूर शहरात अभूतपूर्व व जल्लोषात स्वागत

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**मलकापुर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त धनगर समाज महासंघाच्या वतीने राज्यभर आयोजित करण्यात आलेल्या अहिल्या संदेश यात्रेचे मंगळवारी मलकापुर शहरात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात व जल्लोषात भव्य स्वागत करण्यात आले. वानखेडे पेट्रोल पंप येथून तहसील चौकापर्यंत काढण्यात आलेल्या भव्य पदयात्रेत हजारो समाजबांधव, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



यात्रेचे शहरात आगमन होताच ठिकठिकाणी पुष्पवृष्टी, फुलहार अर्पण, भगव्या ध्वजांची उभारणी आणि जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा विजय असो", "जय मल्हार" अशा घोषणांनी वातावरण भक्तिमय आणि प्रेरणादायी बनले होते. नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी सोहन माच्छरे,शहर पोलीस निरीक्षक गणेश गिरी, शत्रुघ्न पाचपोळ धनगर समाज महासंघ जिल्हा अध्यक्ष, अ‍ॅड हरीश रावळ, संजय काजळे,दामोदर शर्मा, सुहास चवरे, धनश्री ताई काटिकर, विजय साठे, प्रकाश जुबळे, कृष्णा सुशिर धनगर समाज महासंघ तालुका अध्यक्ष , विनय काळे, अनिल पाचपोळ, गजानन वाघ, रामभाऊ घुले, गणेश नेमाडे, निलेश सोनोने, गणेश सुशिर, शिवप्रसाद पाचपोळ, दीपक बोरसे, ऋषी नेमाडे, सुपडा पाचपोळ, जुमळे सर, बोरसे सर, नवलकर सर आणि चंदनशिव सर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी यात्रेचे स्वागत करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तहसील चौक येथे आयोजित कार्यक्रमात मान्यवरांनी मार्गदर्शन करताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे लोककल्याणकारी राज्यकारभार, न्यायप्रियता, महिला सक्षमीकरण, धर्मनिरपेक्ष दृष्टीकोन आणि समाजहितासाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. त्यांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा संदेश यात्रांचे मोठे महत्त्व असल्याचे यावेळी वक्त्यांनी सांगितले. या यात्रेमुळे धनगर समाजामध्ये एकात्मतेची भावना अधिक दृढ झाली असून सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रबोधनाचा प्रभावी संदेश जनतेपर्यंत पोहोचला. युवकांनी मोठ्या शिस्तीत सहभाग नोंदवत यात्रेचे नियोजन यशस्वी केले. महिला भगिनींची उपस्थितीही विशेष लक्षवेधी ठरली. मलकापुर शहरातील नागरिकांनी यात्रेला दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. अहिल्यादेवींच्या विचारांचा जागर करत समाजात एकता, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी रुजविण्याचा संदेश या यात्रेच्या माध्यमातून प्रभावीपणे देण्यात आला.

# सिं. राजा तालुक्यातील शेतकऱ्यांनी पीकविम्याकडे फिरवली पाठ

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**सिंदखेडराजा :** केंद्र व राज्य शासनाच्या वतीने नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी 'पीक विमा योजना' राबवली जाते. मात्र, मागील वर्षी झालेले प्रचंड नुकसान आणि आणि त्यानंतरही त्यानंतरही विमा कंपन्यांकडून मिळालेला 'झिरो' परतावा, यामुळे सिंदखेडराजा तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड निराशा पसरली आहे. परिणामी, यंदा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी पीक विम्याकडे पूर्णपणे पाठ फिरवल्याचे विदारक चित्र समोर आले आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत यंदा पीकविमा काढणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत मोठी घसरण झाली आहेः मागील वर्ष ६५ हजार शेतकऱ्यांनी पिक विमा काढला होता. चालू वर्ष आतापर्यंत) केवळ १७ हजार शेतकऱ्यांना विमाकाढला आहे. चालू वर्षात पीक विमा अर्ज भरण्यासाठी आता केवळ ५ दिवस शिल्लक राहिले आहेत. मात्र, शेतकऱ्यांचा प्रतिसाद अत्यंत थंड आहे. मागील वर्षी निसर्गाच्या कोपाने पिकांचे अतोनात नुकसान झाले. विविध मंत्र्यांनी पाहणी केली त्यामध्ये केंद्रीय मंत्री मा. ना प्रतापरावजी जाधव, जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद आबा पाटील सह पालकमंत्री संजय सावकारे, आ. मनोज कायंदे, माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर, अ‍ॅड नाझेर काझी, प्रदेशाध्यक्ष अल्पसंख्यांक विभाग महाराष्ट्र राज्य यांनी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकाची पाहणी करून शेतकऱ्यांना शासनाकडून मदत दिली, परंतु विमा कंपन्यांनी 'तांत्रिक नियम' आणि 'ट्रिगर बदलल्याचे' कारण पुढे करत शेतकऱ्याला दमडीही दिली नाही. आधीच पेरणीचा खर्च आणि तुटपुंजे उत्पन्न यामुळे बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. पूर्वी 'एक रुपयात पीक विमा' ही योजना सुलभ वाटत होती, मात्र आता प्रति एकर आकारणी आणि पेरणी संपताच भरावा लागणारा हप्ता यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. नुकसान होऊनही भरपाई न मिळाल्याने विमा कंपन्यांवरचा आणि योजनेवरचा शेतकऱ्यांचा विश्वास पूर्णपणे उडाला आहे.

# चिखलदरासह गाविलगड किल्ला, नरनाळा किल्ल्याच्या पर्यटन विकासाला गती द्या!

## आ. रवी राणा यांचे निर्देश, मंत्रालयात समितीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अमरावती :** कर्जत एन डी फिल्म स्टुडिओ गोरेगावचे धर्तीवर चिखलदरा येथे फिल्म स्टुडीओ उभारा, विदर्भाचे नंदनवन चिखलदरा, गाविलगड किल्ला, नरनाळा किल्ला यांच्या पर्यटन विकासाला गती द्या, असे निर्देश अध्यक्ष आ.रवी राणा यांनी समितीला दिले.

राज्यातील गरजू आणि पात्र कलावंतांना थकीत मानधन तातडीने वितरित करण्यात यावे, 'गरजू कलावंत' या संकल्पनेची स्पष्ट व्याख्या निश्चित करण्यात यावी तसेच राज्यातील ज्येष्ठ व गरजू कलावंतांचा शोध घेऊन त्यांची माहिती जिल्हाधिकाऱ्यांमार्फत संकलित करून समितीसमोर सादर करण्यात यावी, असे निर्देश विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनी मंत्रालयात झालेल्या समितीच्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

बैठकीत सन २०१५ पासून प्रलंबित असलेल्या मानधन प्रस्तावांचा आढावा घेण्यात आला. अनेक प्रस्ताव अद्याप मंजूर न झाल्याबद्दल समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी पात्र लाभार्थ्यांची पडताळणी करून सविस्तर अहवाल समितीकडे सादर करावा, तसेच लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन पात्र कलावंतांचे थकीत मानधन तातडीने वितरित करावे, असे निर्देश देण्यात आले.



पर्यटन विकासाबाबत चित्रनगरी, राधानगरी, भुदरगड आणि इतर महत्त्वाच्या पर्यटनस्थळांचा पर्यटन विकास आराखड्यात समावेश करून त्यांचा सर्वांगीण विकास करावा, तसेच पर्यटन हब म्हणून आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात आला. तसेच चिखलदरा, धारणी, प्राचीन गाविलगड किल्ला आणि नरनाळा किल्ल्यांची प्रत्यक्ष पाहणी करून पर्यटन विकासाला गती देण्याचे निर्देश देण्यात आले. गड-किल्ल्यांच्या संवर्धनाबाबत समितीने विशेष भर देत राज्यातील ऐतिहासिक किल्ल्यांवर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी, पर्यटकांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात आणि किल्ल्यांवर घडणाऱ्या अपघात व अनुचित घटना रोखण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. ऐतिहासिक नरनाळा आणि गाविलगड किल्ल्यांकडे विशेष लक्ष वेधत या दोन्ही किल्ल्यांच्या संवर्धन, दुरुस्ती, संरक्षण आणि पर्यटन विकासासाठी आवश्यक सर्व उपाययोजना करण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले. या बैठकीस विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांच्यासह समितीचे सदस्य आमदार राजेश पवार, आमदार समीर मेघे, आमदार अनुपभैय्या अग्रवाल, आमदार विनोद अग्रवाल, आमदार विक्रम पाचपुते, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार पराग शाह, आमदार रमेश कराड, आमदार किशोर पाटील, आमदार अमोल पाटील, आमदार प्रदीप जयस्वाल, आमदार किरण सामंत, आमदार हिरामण खोसकर, आमदार संजय बनसोडे, आमदार दौलत दरोडा, आमदार वरुण सरदेसाई, आमदार अमित झनक आणि आमदार राजू खरे यांच्यासह पर्यटन विभागाचे संचालक विकास पानसरे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे (एमटीडीसी) व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे, सहसंचालक संतोष जाधव, सांस्कृतिक कार्य विभागाचे अधिकारी गि. नि. यादव, सुनिल किसन सूर्यवंशी, सुमंत पास्टे, नरेश वान्हळ, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाच्या संचालक तेजस मदन गर्णे, पर्यटन विभागाचे उपसचिव विजय कृष्णाजी पोवार व संजय रोकडे, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, विक्रम देशमुख, यशवंत थोरात, राहुल पवार, संसदीय कार्य विभागाचे अवर सचिव अनिल गणे, कार्यकारी अभियंता सचिन पाटील यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### समन्वयाने कार्यवाही करण्याचे निर्देश

बैठकीत समितीने प्रलंबित आश्वासनांची वेळेत पूर्तता करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करून निश्चित कालमर्यादेत अहवाल सादर करावेत, असे निर्देश देत कलावंत कल्याण, पर्यटन विकास, गड-किल्ल्यांचे संवर्धन आणि फिल्म सिटी व्यवस्थापन या विषयांवर तातडीने प्रभावी कार्यवाही करण्यावर भर दिला.

जिल्ह्यात १०० गरजू कलावंतांना मानधन देण्याचा प्रोविजन आहे परंतु लोकंप्रतिनिधींना विश्वासात घेऊन त्यांचे शिफारशीने ते प्रस्ताव तपासून तातडीने वितरित करा.

-आ.रवी राणा,
विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष

## 'भारत कृषक'ची वृक्षरोपण मोहीम सुरु

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला:** १ ऑगस्ट २०२६ पासुन भारत कृषक समाजाची राज्यभर वृक्षारोपण मोहिमेची सुरूवात भंडारा, चंद्रपुर जिल्हयापासून पवनी, मोहाडी, वरोरा, भ्रदावती येथील शाळा, कॉलेज, पोलीस स्टेशन, मंदिर, कॉलनीज, कार्यालय अशा विविध ठिकाणी वृक्षारोपण करून करण्यात आली.त्यावेळी शाळेच्या मुला-मुलींनी, फ्रेन्डशिप डे च्या निमित्याने झाडालाच मित्र बनवून त्याची देखभाल करून त्याला जगवण्याची जबाबदारी सुध्दा घेतली. यावेळी चेअरमन डॉ. प्रकाश मानकर, डॉ. रमेश ठाकरे, राजेन्द्र गावंडे, डॉ. यशवंत घुमे, प्रा. नामदेव उमाळे, प्रा. काकडे, प्रा. आमानकर, प्रा.डी सावे, पोलीस उपनिरिक्षक योगेश्वर पारधी, अविनाश चौधरी, देवा मिरासे, मदनलाल बागडे, विलासराव गायधने, नारायणराव पागोनिवाल, नरेश गोबाडे, सुहासराव टोंग, राजेश्वर गोडे, मेघराम जंजाळ, तुकाराम बोंद्रे, अमोल बान्डबुचे, माधव भारसाकळे, कैलास ईगळे, इत्यादि तसेच शाळा कॉलेजचे मुले-मुली मोठया प्रमाणावर उपस्थित होते.

# विनापरवानगी औदुंबराचे वृक्ष तोडल्याचा आरोपीवर गंभीर आरोप

## अकोल्यातील खदान पोलिसांत आरोपीविरुद्ध तक्रार

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला:** सहकार नगर परिसरात ६० वर्षे जुने औदुंबराचे धार्मिक पवित्र असलेले झाड विनापरवानगी तोडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी वृक्षमित्र अजय गावंडे यांनी खदान पोलीस ठाण्यात आरोपी रौनक भिमजियानी विरुद्ध तक्रार नोंदवली आहे. अकोल्यातील सहकार नगर येथे राहणाऱ्या रौनक भिमजियानी यांनी आपल्या घराच्या बांधकामादरम्यान लगतच्या शासकीय जागेतील ६० वर्षे जुने औदुंबराचे झाड विनापरवानगी तोडल्याचा आरोप आहे. धार्मिकदृष्ट्या अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या आणि परिसरात पूजनीय असलेल्या या वृक्षाची फांद्या छाटून जे सी बी च्या साहाय्याने मुळापासून तोडण्याचा प्रयत्न केला गेला. याप्रकरणी अकोला महानगरपालिकेकडे तक्रार करूनही वृक्षतोड सुरूच राहिल्याने अजय गावंडे यांनी खदान पोलीस ठाण्यात धाव घेतली. या बेकायदेशीर कृत्यामुळे निसर्गाची हानी तर झालीच, शिवाय हिंदू धर्माच्या भावनाही दुखावल्या आहेत. आरोपीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी आता होत आहे.



### पेव्हर ब्लॉकसाठी थेट वृक्षांची कत्तल

अकोला शहरात तीव्र उन्हाळ्यात अकोलेकर होरपळून जातात. तीव्र उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी गोरक्षण वरील सजग नागरिकांनी या रस्त्यावर पाच वर्षांपुर्वी वृक्षारोपण करत झाडे लावले. पण, महापालिकेच्या प्रदूषण मुक्त कार्यक्रमात या ठिकाणी पेव्हर बसविण्यासाठी थेट वृक्षतोड झाल्याचा आरोप वृक्षप्रेमी अजय गावंडे यांनी केला आहे.

नेहरु पार्क समोरील ही परिस्थिती आहे. या ठिकाणी पाच वर्षापुर्वी लावलेले झाडे जेसीबीच्या सहाय्याने तोडण्यात आले. महापालिकेच्या अभियंत्यांना या विषयीची कुठली ही माहिती नाही. या भागात वृक्षबचाव आणि वृक्ष वाढविण्यासाठी दिवसरात्र एक करणारे अजय गावंडे यांनी या सर्व प्रकाराला विरोध केला. या ठिकाणी लावलेल्या झाडांचे संरक्षण करत त्यांना कुठलीही इजा न होऊ देता पेव्हर बसविण्याचे काम करता येते. पण, बेकायदेशीर वृक्षतोड करुन विकास कामे करु देणार नाही असा स्पष्ट संदेश अजय गावंडे यांनी दिला आहे.

# संजय गांधी व श्रावणबाळ योजनेचे लाभार्थी वाऱ्यावर

## पोर्टल ठप्प; लाभार्थ्यांवर उपासमारीची वेळ

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला :** राज्यातील लाखो निराधार, वृद्ध आणि दिव्यांग आपल्या उदरनिर्वाहासाठी शासनाच्या संजय गांधी व श्रावण बाळ योजनांवर अवलंबून आहेत. परंतु मागील अनेक दिवसांपासून निराधार लाभार्थ्यांना योजनेचे पैसे न मिळाल्याने त्यांच्यासमोर उपासमारीचे संकट उभे ठाकले आहे . निराधार लाभार्थ्यांसाठी जीवनरेषा ठरलेल्या संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेचे कामकाज 'एसएएस' पोर्टलच्या तांत्रिक बिघाडामुळे ठप्प झाले असून,



जिल्ह्यातील लाभार्थ्यांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. sas.mahait.org हे अधिकृत पोर्टल गेल्या काही दिवसांपासून नियमितपणे सुरू होत नसल्याने योजनांशी संबंधित सर्व ऑनलाइन प्रक्रिया अक्षरशः ठप्प झाल्या आहेत. या गंभीर समस्येकडे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि अकोला तहसीलदारांनी त्वरित लक्ष द्यावे अशी मागणी संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी करीत आहेत. तसेच पोर्टल बंद असल्याने नवीन अर्जांची नोंदणी, लाभार्थ्यांची पडताळणी व मंजुरी, त्रुटी दुरुस्ती, डीबीटी संदर्भातील प्रक्रिया तसेच इतर सर्व ऑनलाइन कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. परिणामी निराधार, वृद्ध, दिव्यांग आणि इतर गरजू लाभार्थ्यांना वारंवार तहसील कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असून, आर्थिक नुकसानासोबतच मानसिक त्रासही सहन करावा लागत आहे. हे पाहता या योजनेचे काम सुरळीत करून निराधार लाभार्थ्यांना त्यांचे मानधन त्वरित मिळावे अशी मागणी होत आहे

## ऑपरेशन प्रहार' अंतर्गत 4 जुगार अड्ड्यांवर धाड

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला:** अकोला शहरातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत धडक कारवाई केली आहे. शहर व परिसरातील ४ वेगवेगळ्या जुगार अड्डयांवर धाडी टाकून पोलिसांनी १८ आरोपींना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण ७५,२३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ३ आणि ४ ऑगस्ट रोजी ही विशेष मोहीम राबवण्यात आली.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135